स्वातंत्र्य दिन विशेषांक

— DEVELOPED NATIONS —

# डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज

Journalism for justice

▪ PRGI No. : MHMUL/25/A0594

**वकिली ते वाङ्मय: एका प्रवासाची गाथा**



पान १०

‘द कोर्ट-कोट नेव्हर लिमिटेड माय ड्रीम्स’ असे म्हणत साहित्यासाठी जीवन वाहून घेणारे ज्येष्ठ विधिज्ञ रंगत-संगत प्रतिष्ठानचे संस्थापक ॲड. प्रमोद आडकर यांची गाथा!

सर्व प्रकारच्या जाहीर सूचना/ वकील नोटीस आणि अन्य जाहिराती स्वीकारण्याकरिता
संपर्क : श्रेयश दहिवळ, मो. ९९२२४१२४५१
ऑफिस संपर्क : ०२०-२९९९ २५३०

QR Code स्कॅन करा, पे करा.

वर्गणीचे पर्याय | स्वागत मूल्य : फक्त रु. १०
एक वर्षासाठी रु. ५००

रक्कम भरल्याची पेमेंट रिसीट,आपले नाव, पिनकोडसह पूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर : ९९२२४१२४५१ या क्रमांकावर मॅसेज करा!

♦ वर्ष १ ♦ अंक : १ ♦ साप्ताहिक ♦ पुणे, सोमवार, दिनांक १७ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट २०२६ ♦ Email : developednationslaw@gmail.com ♦ पाने : १६ ♦ स्वागतमूल्य : १० रु. अंक व जाहिरातींसाठी : ९९२२४१२४५१

## विशेष संपादकीय

## हक्क आणि कर्तव्यांचा मेळ : खऱ्या स्वातंत्र्याची गुरुकिल्ली

भारताने १९४७ मध्ये राजकीय स्वातंत्र्य मिळवले, परंतु खरे स्वातंत्र्य अद्याप बाकी आहे. मतदानाचा अधिकार, संविधान आणि लोकशाही संस्था मिळाल्या तरी गरीबी, विषमता, जातीय भेदभाव, स्त्री-पुरुष असमानता आणि भ्रष्टाचार हे राष्ट्राच्या प्रगतीला अडथळा ठरतात. नागरिक आज हक्कांबद्दल आवाज उठवतात, पण फार थोडे लोक आपली कर्तव्ये पार पाडतात. जबाबदारी दुर्लक्षित राहते तेव्हा स्वातंत्र्य अपूर्ण ठरते.



ॲड. विशाल विजयराव काळे
मुख्य मार्गदर्शक

भारत खऱ्या अर्थाने स्वतंत्र तेव्हाच होईल जेव्हा विद्यार्थी शिक्षणाला समाजसेवेची तयारी म्हणून पाहतील; तरुण नागरिकत्वाची जबाबदारी स्वीकारतील; प्रौढ प्रामाणिकपणे अर्थव्यवस्थेत योगदान देतील; आणि ज्येष्ठ तरुणांना मूल्ये व शहाणपणाने मार्गदर्शन करतील. हक्क स्वातंत्र्य देतात; कर्तव्य सन्मान देतात. दोन्ही मिळून खरी स्वातंत्र्य देतात.

संविधानातील अनुच्छेद ५१-अ नुसार प्रत्येक नागरिकाने संविधानाचा सन्मान करणे, स्वातंत्र्य संग्रामातील बलिदानांचा गौरव करणे, भारताची सार्वभौमता आणि अखंडता जपणे, देशाचे संरक्षण करणे, समाजातील सौहार्द आणि समानता वाढवणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि मुलांना शिक्षण देणे ही कर्तव्ये पार पाडावीत. ही कर्तव्ये दररोज पवित्र साधनेप्रमाणे पार पाडली तर भारताचे स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने पूर्ण होईल.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी दाखवून दिलेला मार्ग आपल्याला प्रेरणा देतो. यशवंतराव चव्हाण यांनी आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी केली आणि सहकारी चळवळ उभी केली. वसंतराव नाईक यांनी हरित क्रांती घडवून आणली आणि ग्रामीण विकासाला चालना दिली. शरद पवार यांनी औद्योगिक वाढ, शिक्षण आणि सहकारी बँकिंग मजबूत केले. ए. आर. अंतुले यांनी गृहनिर्माण योजना आणि सामाजिक न्यायावर भर दिला. देवेंद्र फडणवीस यांनी समृद्धी महामार्ग, मुंबई मेट्रो, कोस्टल रोड आणि राष्ट्रीय कायदा विद्यापीठे उभारून पायाभूत सुविधा व कायदे शिक्षणाला नवे बळ दिले. या नेत्यांनी दाखवून दिले की राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसून समाजनिर्मितीसाठी असते. आज भारताला अशाच जबाबदार, दूरदृष्टीचे आणि कर्तव्यनिष्ठ राजकारणी हवे आहेत.

पान ४ पहा ▸▸




# ‘फास्ट’ ट्रॅक...!

**बलात्कार आणि पॉक्सो ‘फास्ट ट्रॅक’ न्यायालयांच्या निकालांचा वेग नॉर्मल इतकाच मंद; खटले २.५ लाखांवर! वर्षाला १.४ लाख दाखल, पण ६६,५०० प्रकरणांचाच निकाल!**

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

देशभरात महिला आणि बालकांवरील अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी आणि अशा गुन्ह्यांमधील खटल्यांचा निपटारा अत्यंत वेगाने करण्यासाठी विशेष ‘फास्ट ट्रॅक’ न्यायालये स्थापन करण्यात आली होती. मात्र, या विशेष न्यायालयांची सध्याची अवस्था अत्यंत दयनीय आणि चिंताजनक बनली आहे. या न्यायालयांच्या नावामध्ये ‘फास्ट’ (वेगवान) असा शब्द असला तरी, प्रत्यक्षात मात्र त्यांची काम करण्याची आणि खटले चालवण्याची गती अत्यंत धिम्या आणि सुस्त गतीने सुरू आहे. अतिशय संवेदनशील असलेल्या या न्यायदान प्रक्रियेत कागदावर मोठे दावे केले जात असले तरी वास्तवात मात्र पीडितांची परवड सुरूच असल्याचे समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, २०२५ या एकाच वर्षात देशभरात १ लाख ४० हजारांहून अधिक बलात्काराचे आणि ‘पॉक्सो’ (POCSO) कायद्यांतर्गत खटले दाखल झाले होते, परंतु त्यापैकी केवळ ६६,५०० प्रकरणांचाच अंतिम निकाल लावण्यात प्रशासनाला यश आले आहे.

प्रलंबित प्रकरणांचा महापूर आणि खालावत चाललेला वेग देशातील फास्ट ट्रॅक न्यायालयांच्या एकूणच कार्यक्षमतेवर अत्यंत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आकडेवारी नुकतीच संसदेत समोर आली आहे. उपलब्ध अधिकृत माहितीनुसार, ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत देशभरातील न्यायालयांमध्ये या अतिसंवेदनशील प्रकरणांचा बॅकलॉग तब्बल २.५ लाखांच्या घरात पोहोचला आहे.

पान ४ पहा ▸▸



**निकाली खटले**

| वर्ष | निकाल लागलेले खटले | वर्ष-दर-वर्ष बदल | वर्षाच्या शेवटी प्रलंबित खटले |
|---|---|---|---|
| २०२१ | ३६,४७० | लागू नाही | १.८ लाख+ |
| २०२२ | ६४,०५३ | ७५.६% | १.९ लाख+ |
| २०२३ | ७६,३४९ | १९.२% | २ लाख+ |
| २०२४ | ८५,५९५ | १२.१% | २ लाख+ |
| २०२५ | ६६,५०० | -२२.३% | २.४ लाख+ |

(स्रोत: न्याय विभाग, संसद, भारत सरकार)

YUVRAJ DHAMALE CORP

‘युवराज ढमाले कॉर्प’ कडून
— DEVELOPED NATIONS —
डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
Journalism for justice
वृत्तपत्राला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

# पौड न्यायालयात जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था

## वकिलांसह पक्षकारांचे होत आहेत हाल

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

मुळशी तालुक्यातील न्यायदान यंत्रणेला गती देण्यासाठी ३ ऑगस्ट २०२५ रोजी पौड येथे स्वतंत्र दिवाणी व फौजदारी न्यायालयाची स्थापना करण्यात आली. या नव्या न्यायालयामुळे तालुक्यातील नागरिकांची सोय झाली असली, तरी न्यायालयाकडे येणाऱ्या मुख्य रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली आहे. रस्ता पूर्णपणे खड्डेमय बनल्यामुळे "न्यायाचा रस्ता" खडतर बनला असून, वकिलांसह पक्षकारांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

सार्वजनिक सुविधांचा वानवा पौड येथील नवीन न्यायालयाच्या इमारतीचे कामकाज सुरू झाले असले, तरी परिसरामध्ये मूलभूत व सार्वजनिक सुविधांचा मोठा अभाव आहे. त्यातही मुख्य पौड रस्त्यापासून न्यायालयाकडे येणारा रस्ता पूर्णपणे उखडला असून येथील डांबर वाहून गेले आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात किंवा उन्हाळ्यात या रस्त्यावरून वाहन चालवणे किंवा चालत जाणे अत्यंत जिकिरीचे ठरत आहे. याविषयी दाद मागितली असता, "रस्ता मंजूर झाला आहे आणि लवकरच त्याचे काम होईल," असे ठरार व शासकीय उत्तर मिळून प्रत्यक्षात मात्र काहीच हालचाल झालेली नाही.



**वयोवृद्ध आणि अपंगांचे हाल**

न्यायालयात रोज कामानिमित्त येणाऱ्या पक्षकारांची संख्या मोठी आहे. यामध्ये अनेक वयोवृद्ध नागरिक, महिला तसेच अपंग पक्षकारांचा समावेश असतो. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे आणि प्रवासातील अडचणींमुळे या दुर्बल घटकांना न्यायालयात पोहोचताना प्रचंड शारीरिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते.

यासंदर्भात मुळशी तालुका बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. संजय चंद्रकांत मारणे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. न्यायालयासारख्या महत्त्वाच्या ठिकाणी जाण्यासाठी असा खडतर रस्ता असणे न्यायवस्थेला शोभणारे नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले.



मुळशी तालुका बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी तातडीने रस्ता दुरूस्तीची मागणी केली आहे.

या गंभीर प्रश्नाबाबत मुळशी तालुका बार असोसिएशनचे सचिव ॲड. योगेश साठे यांनी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की, "पूर्वी पौड येथे फक्त फौजदारी न्यायालय कार्यरत होते. मात्र, आता दिवाणी न्यायालय सुरू झाल्यामुळे न्यायालयातील दावे आणि पक्षकारांची संख्या कैक पटीने वाढली आहे. त्या प्रमाणात आजही परिसरात पुरेशा सार्वजनिक सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत." न्यायालयाच्या इमारतीपर्यंत पोहोचणारा मुख्य रस्ता चांगला असणे ही प्राथमिक गरज असताना प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल वकिलांमध्ये तीव्र रोष पसरला आहे.

पौड न्यायालयातील वाढती गर्दी आणि पक्षकारांची होणारी हेळसांड लक्षात घेता, प्रशासनाने तात्काळ गांभीर्य ओळखून या रस्त्याच्या कामाला गती द्यावी, अशी जोरदार मागणी मुळशी तालुका बार असोसिएशनच्या वतीने होत आहे. केवळ तोंडी आश्वासने न देता, प्रशासनाने प्रत्यक्ष कृती करून लवकरात लवकर रस्ता पूर्ण करावा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा पवित्रा घेतला जाईल, असा इशाराही बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. न्याय मागण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना निदान चांगला रस्ता तरी उपलब्ध करून द्यावा, हीच सध्याची सर्वात मोठी आणि तातडीची मागणी बनली आहे.

# वकिलीत 'कष्ट' हीच यशाची गुरुकिल्ली : ॲड. आव्हाड

## नवनियुक्त बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार आणि जे.एम.एफ.सी. स्पर्धा परीक्षा पुस्तकाचे अनावरण संपन्न

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

वकिली व्यवसाय हा अत्यंत प्रतिष्ठित व्यवसाय असला तरी यामध्ये टिकून राहण्यासाठी आणि यश मिळवण्यासाठी शॉर्टकटला काहीही स्थान नाही. या व्यवसायात केवळ 'कष्ट, कष्ट आणि कष्ट' याच गोष्टीला पर्याय नाही," असे प्रतिपादन ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सुधाकरराव आव्हाड यांनी केले. पुणे बार असोसिएशनतर्फे 'वकिली व्यवसाय - नीतिमूल्ये व आव्हाने' या विषयावर आयोजित विशेष मार्गदर्शन सत्रात ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. काळुराम भुजबळ यांनी भूषवले.

कार्यक्रमाची सुरुवात करताना ॲड. आव्हाड यांनी एका मार्मिक गोष्टीद्वारे वकिलांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आचरणावर प्रकाश टाकला. वकील हा २४ तास वकील असतो, त्यामुळे समाजमान्य उच्च नैतिक मूल्ये आणि चांगली वागणूक वकिलांच्या रक्त भबली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. अलीकडील काळात सोशल मीडियावर रील्स बनवण्याकडे किंवा प्रसिद्धीसाठी होणाऱ्या प्रकारांवर चिंता व्यक्त करत, या गोष्टींचा दूरगामी परिणाम संपूर्ण वकिली पेशावर होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात पुढे बोलताना ॲड. आव्हाड यांनी देशातील आणि राज्यातील वाढत्या लॉ कॉलेजच्या संख्येवर आणि वकिलांच्या अमर्याद वाढत्या संख्येवर बोट ठेवले. आज तालुक्याच्या ठिकाणी आणि




शहरांमध्ये वकिलांची संख्या झपाट्याने वाढत असून, यामुळे स्पर्धेत टिकून राहण्यासाठी 'सर्वायव्हल ऑफ द फिटेस्ट' ही परिस्थिती निर्माण झाली आहे आणि बऱ्याचदा यामुळे अनैतिक प्रॅक्टिसेसला बळी पडावे लागते, याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करताना वकिलांनी वाचनाची आणि अभ्यास करण्याची सवय सोडू नये, असा मोलाचा सल्ला त्यांनी तरुण वकिलांना दिला.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात ॲड. सुधाकरराव आव्हाड लिखित जे.एम.एफ.सी. स्पर्धा परीक्षा पुस्तकाचे औपचारिक अनावरण करण्यात आले. याशिवाय, पुणे बार असोसिएशनच्या वतीने अलीकडेच निवडणूक झालेल्या फॅमिली कोर्ट बार असोसिएशन, घोडनदी बार असोसिएशन आणि सासवड बार असोसिएशनच्या नवनियुक्त अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव तसेच संपूर्ण नवीन कार्यकारिणीचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे सदस्य ॲड. गणेश शिरसाट आणि ॲड. अहमदखान पठाण हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. काळुराम भुजबळ आणि सर्व कार्यकारिणी सदस्यांनी केले होते.

# 'न्यू बिल्डिंग' आणि 'स्मॉल कॉज' मध्ये मोफत वाय-फाय सुविधा

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

पुणे जिल्हा न्यायालय परिसरातील वकिलांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. वकिलांच्या दीर्घकाळच्या मागणीला अखेर मोठे यश मिळाले असून, पुणे बार असोसिएशनतर्फे स्मॉल कॉज कोर्ट आणि न्यू बिल्डिंग परिसरात मोफत वाय-फाय सुविधा सुरू करण्यात आली आहे. या सुविधेमुळे न्यायालयीन कामकाजादरम्यान इंटरनेट कनेक्टिव्हिटीमुळे निर्माण होणाऱ्या अडथळ्यांवर मात करणे शक्य होणार आहे.

**इंटरनेट समस्येमुळे वकिलांना होत होती कसरत**

पुणे जिल्हा न्यायालय परिसरात मोठ्या संख्येने वकील प्रॅक्टिस करतात. मात्र, या परिसरात मोबाईल नेटवर्कची कमतरता आणि पुऱ्या कनेक्टिव्हिटीअभावी इंटरनेटच्या तीव्र समस्येला वकिलांना गेल्या अनेक दिवसांपासून सामोरे जावे लागत होते. आजच्या डिजिटल युगात ई-फायलिंग करणे, ऑनलाइन सुनावणीत सहभागी होणे, न्यायनिर्णयांचा सखोल अभ्यास करणे, कायदेशीर संशोधन (Legal Research) करणे तसेच केस पेपर तयार करणे यासाठी हाय-स्पीड इंटरनेटची नितांत गरज असते. नेटवर्कच्या समस्येमुळे वकिलांचे अनेक महत्त्वाचे डिजिटल कामकाज रखडत होते आणि कामात अनावश्यक अडथळे निर्माण होत होते.

**पाठपुराव्याला यश; उत्स्फूर्त प्रतिसाद**

वकिलांच्या या गंभीर समस्येची दखल घेत पुणे बार असोसिएशनच्या विद्यमान कार्यकारिणीने या प्रश्नावर सातत्याने आणि




पुणे जिल्हा न्यायालयातील वकिलांना इंटरनेट व मोबाईल नेटवर्कच्या समस्येमुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. वकिलांच्या या अडचणीची गंभीर दखल घेऊन पुणे बार असोसिएशनने सातत्याने पाठपुरावा केला आणि त्यातून आज ही मोफत वाय-फाय सुविधा उपलब्ध झाली आहे. भविष्यातही वकिलांच्या हितासाठी आधुनिक व उपयुक्त सुविधा उपलब्ध करून देण्यास आमची कार्यकारिणी कटिबद्ध राहील.

ॲड. सम्राट जांभुळकर,
सचिव, पुणे बार असोसिएशन

गांभीर्याने पाठपुरावा केला. काही दिवसांपूर्वीच सिव्हिल कोर्ट इमारतीमध्ये मोफत वाय-फाय सुविधा सुरू करण्यात आली होती. वकिलांकडून या उपक्रमाला अत्यंत उत्स्फूर्त आणि सकारात्मक प्रतिसाद मिळाला. याच पार्श्वभूमीवर आता स्मॉल कॉज कोर्ट बिल्डिंग आणि न्यू बिल्डिंग परिसरातही मोफत वाय-फाय झोन अधिकृतपणे सुरू करण्यात आला आहे. या सुविधेचे औपचारिक उद्घाटन नुकतेच न्यायालयीन क्षेत्रातील मान्यवरांच्या आणि पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत थाटात संपन्न झाले.

# जाणून घ्या कायद्याची भाषा

- **खरेदीदाराने सावध राहावे** (Caveat Emptor) : व्यावसायिक करारांमध्ये माल खरेदी करताना ग्राहकाने स्वतः डोळसपणे तपासणी करावी, नंतर विक्रेत्याला दोष देता येत नाही.
- **मालकाने सावध राहावे** (Caveat Venditor) : आधुनिक कायद्यानुसार, विकलेल्या मालातील दोषांची जबाबदारी विक्रेत्याची असते, त्यामुळे त्याने ग्राहकाला वस्तूची पूर्ण माहिती दिली पाहिजे.
- **प्रतिनिधिक उत्तरदायित्व** (Vicarious Liability) : एका व्यक्तीने केलेल्या चुकीची कायदेशीर जबाबदारी दुसऱ्या व्यक्तीवर असणे (उदा. नोकराने केलेल्या चुकीबद्दल मालक जबाबदार असणे).
- **वचनाचे पालन करणे** (Promissory Estoppel) : जर एखाद्या प्राधिकरणाने किंवा व्यक्तीने समोरच्याला काही आश्वासन दिले असेल आणि त्यावर विश्वास ठेवून समोरच्याने कृती केली असेल, तर सरकारला ते आश्वासन पाळावेच लागते.
- **गंभीर चूक किंवा गुन्हा** (Flagrante Delicto) : एखाद्या गुन्हेगाराला गुन्हा करताना रंगेहाथ (Red-handed) पकडणे; हा न्यायालयात अत्यंत सबळ पुरावा मानला जातो.
- **करारातील तोटा भरपाई** (Liquidated Damages) : करार करतानाच, करार मोडल्यास किती नुकसान भरपाई द्यावी लागेल, हे दोन्ही पक्षांनी आधीच निश्चित करून ठेवलेली रक्कम.
- **अनिर्धारित नुकसान भरपाई** (Unliquidated Damages) : करारामध्ये आधी रक्कम ठरवली नसताना, झालेल्या नुकसानीचा अंदाज घेऊन न्यायालय स्वतः जी भरपाई निश्चित करते ती रक्कम.




- **अविश्वासू साक्ष** (Hostile Witness) : ज्या पक्षाने साक्षीदाराला आपल्या बाजूने साक्ष देण्यासाठी बोलावले आहे, तोच साक्षीदार न्यायालयात फिरून विरुद्ध पक्षाच्या बाजूने बोलू लागणे.
- **खटला चालवण्याची मर्यादा** ( Statute of Limitations) : गुन्ह्याविरुद्ध किंवा दिवाणी वादाविरुद्ध न्यायालयात दाद मागण्यासाठी कायद्याने ठरवून दिलेली अंतिम मुदत (त्यानंतर खटला दाखल करता येत नाही).
- **कायदेशीर नोटीस** (Legal Notice) : औपचारिक न्यायालयीन कारवाई सुरू करण्यापूर्वी, विरुद्ध पक्षाला आपली मागणी पूर्ण करण्यासाठी दिलेली अंतिम लेखी ताकीद.
- **कायदेशीर ताबा** (De Jure) : कायद्यानुसार असणारा हक्क किंवा मालकी, जरी प्रत्यक्ष वस्तू किंवा जागा सध्या दुसऱ्याच्या ताब्यात असली तरीही.
- **प्रत्यक्ष ताबा** (De Facto) : कायद्यानुसार अधिकार असो वा नसो, परंतु प्रत्यक्ष व्यवहारात किंवा जमिनीवर असणारा ताबा किंवा नियंत्रण.
- **नवीन करार करणे** (Novation) : जुना कायदेशीर करार रद्द करून, दोन्ही पक्षांच्या संमतीने त्याच जागी संपूर्णपणे नवीन अटींचा करार लागू करणे.
- **सहेतुक लपवाछपवी** (Suppressio Veri) : करार किंवा व्यवहाराच्या वेळी समोरच्या पक्षाला फसवण्याच्या उद्देशाने महत्त्वाची कायदेशीर तथ्ये किंवा सत्य माहिती दाबून ठेवणे.
- **असत्य विधानाचा आधार** (Suggestio Falsi) : समोरच्या व्यक्तीची फसवणूक करण्यासाठी एखादी खोटी किंवा नसलेली गोष्ट खरी असल्याचे भासवून कायदेशीर दस्तऐवज तयार करणे.

## शांतता...हे कोर्ट आहे!

– DEVELOPED NATIONS –
डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज




# ८० हजारांहून अधिक आरटीआय प्रलंबित

## देशातील सर्वाधिक प्रलंबित प्रकरणे महाराष्ट्रात

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाच्या कामकाजाबाबत एक अत्यंत गंभीर माहिती समोर आली असून, राज्यावर ८० हजाराहून अधिक माहितीच्या अधिकाराशी (RTI) संबंधित प्रलंबित प्रकरणांचा मोठा डोंगर उभा राहिला आहे. विशेषतः माहिती आयुक्तांची महत्त्वाची पदे रिक्त असल्याने ही परिस्थिती आणखी बिकट बनली आहे. वृत्तपत्राच्या आणि नागरी संस्थांच्या अहवालानुसार, न्यायालयाच्या २०१९ च्या आदेशाचे पालन करून तयार करण्यात आलेल्या अद्ययावत डेटामध्ये ही बाब स्पष्ट झाली आहे.

एकीकडे महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाने हजारो अपीले आणि तक्रारी निकाली काढल्याचा दावा केला आहे, तर दुसरीकडे नागरिकांना अद्यापही न्याय मिळण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. अहवालानुसार, प्रशासनाने काही महिन्यांत ८४,५६९ अपीले आणि तक्रारी निकाली काढल्याचे समोर आले आहे, ज्यामुळे प्रलंबित प्रकरणांच्या आकड्यात किंचित घट झाली आहे. मात्र, तरीही देशात सर्वाधिक प्रलंबित प्रकरणे असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचे नाव आघाडीवर आहे.

या संपूर्ण प्रकरणावर स्पष्टीकरण देताना राज्य मुख्य माहिती आयुक्त राहुल भालचंद्र पांडे यांनी आयोगाची भूमिका मांडली. ते म्हणाले की, "माहिती आयुक्त आणि इतर आयुक्तांच्या रिक्त जागा पूर्ण झाल्यानंतर आयोगाच्या दैनंदिन कामकाजात व कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा झाली आहे."

पांडे यांनी पुढे भर दिला की, "जेव्हा सर्व पदे भरली जातात आणि सर्व खंडपीठे पूर्ण क्षमतेने व जोमाने काम करतात, तेव्हा निकालाचा वेग वाढतो. आम्ही कमी कालावधीत सुमारे ९३ टयांहून अधिक प्रकरणे यशस्वीपणे निकाली काढली आहेत."




प्रशासनाचे कार्य सुधारण्यासाठी आयोगाने काही आधुनिक व प्रभावी उपाययोजना देखील हाती घेतल्या आहेत. यामध्ये हायब्रीड व ऑनलाइन सुनावणीची पद्धत सुरू करणे, मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या अपीलांचे अचूक वर्गीकरण करणे आणि प्रत्येक खंडपीठात सुनावणीला प्राधान्य देणे यांचा समावेश आहे. या उपायांमुळे अनेक प्रकरणांचा निपटारा करणे सोपे झाले असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

प्रशासनाने कितीही दावे केले तरी प्रत्यक्षात सामान्य नागरिकांसमोर आणि कार्यकर्त्यांसमोर आव्हाने अद्याप कायम आहेत. माहिती अधिकार कार्यकर्ते विरेंद्र दुर्वे यांनी या मुद्द्यावर परखड मत व्यक्त केले. त्यांच्या मते, आयोगाने ९३ टक्के प्रकरणे निकाली काढल्याचा दावा केला असला, तरी आजही अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत आणि हजारो अर्जदार आपल्या अपीलांच्या प्रतीक्षेत आहेत. डिसेंबर अखेरपर्यंत राज्य आयोगासमोर ८०,००० हून अधिक द्वितीय अपीले आणि तक्रारी प्रलंबित असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते.

मुख्य माहिती आयुक्त राहुल भालचंद्र पांडे यांनी मात्र असे स्पष्ट केले आहे की, तंत्रज्ञानाचा वापर करून आणि पारदर्शकता वाढवून ही यंत्रणा अधिक गतिमान करण्याचे त्यांचे धोरण आहे. मुख्यमंत्र्यांच्या आणि प्रधानमंत्र्यांच्या धोरणाशी सुसंगत राहून माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी अधिक जलद गतीने करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. असे असले तरी, तळागाळातील नागरिकांना तात्काळ न्याय मिळवून देण्यासाठी आणि प्रकरणांचा हा प्रचंड अनुशेष संपवण्यासाठी राज्य माहिती आयोगाला आगामी काळात अजून अधिक ठोस, वेगवान आणि प्रभावी पावले उचलण्याची गरज असल्याचे स्पष्ट होत आहे.

# सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय : पुणे बिल्डरविरोधात लढणाऱ्या वकिलांना दिलासा

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

पुण्यातील एका रिअल इस्टेट बिल्डरविरोधात न्यायालयात बाजू मांडल्यामुळे पोलिसांकडून छळ होत असल्याचा आरोप करणाऱ्या पाच वकिलांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा झटका दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने या वकिलांना तातडीने दिलासा देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. मात्र, या प्रकरणाची सुनावणी सर्वोच्च प्राधान्याने घेण्याचे निर्देश न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाला दिले आहेत. या घडामोडींमुळे कायदेशीर वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

या प्रकरणातील विशेष बाब म्हणजे, वकिलांनी या प्रकरणाचा तपास पुणे पोलिसांकडून काढून इतर यंत्रणेकडे किंवा सीबीआयकडे हस्तांतरित करण्याची मागणी केली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावली आहे. त्यामुळे या प्रकरणाचा सद्यस्थितीतील तपास पुणे पोलिसांकडेच कायम राहणार आहे.

**प्रकरणाची पार्श्वभूमी**

काही दिवसांपूर्वी पुण्यातील एका बड्या रिअल इस्टेट विकासकाविरोधात (बिल्डर) काही पक्षकारांनी न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणात संबंधित पाच वकिलांनी त्या बिल्डरविरोधात न्यायालयात बाजू मांडली होती. परंतु, या प्रकरणानंतर पुणे पोलिसांनी आपल्याला लक्ष्य केल्याचा आणि विनाकारण पोलीस कारवाईचा सामना करावा लागत असल्याचा गंभीर आरोप या वकिलांनी केला होता. स्वतःच्या सुरक्षेसाठी आणि निष्पक्ष तपासासाठी त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. शुक्रवारी झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने या वकिलांची याचिका फेटाळली नसली, तरी त्यांना मुंबई उच्च न्यायालयात दाद मागण्यास सांगितले आहे.

पान १ वरून

# 'फार्स' ट्रॅक...!

गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने हीच वाईट आणि चिंताजनक परिस्थिती कायम असून, देशभरात प्रलंबित असलेल्या खटल्यांची संख्या दरवर्षी सातत्याने २ लाखांच्या वरच राहिली आहे. सन २०१९ मध्ये जेव्हा देशात ही विशेष न्यायालये अधिकृतपणे स्थापन करण्यात आली होती, तेव्हापासून आजपर्यंत न्याय मिळण्याचा वेग हा कधीही अपेक्षेप्रमाणे वेगवान राहिला नसल्याचे यावरून स्पष्ट होते.

वर्षनिहाय आकडेवारी काय सांगते? सरकारी दप्तरी नोंदवलेल्या आकडेवारीवर नजर टाकल्यास असे दिसून येते की, २०२१ पासून प्रलंबित खटल्यांच्या संख्येत सतत आणि मोठी वाढ होत गेली आहे. वर्ष २०२१ मध्ये प्रलंबित प्रकरणांची संख्या १.८ लाख इतकी होती, जी २०२२ मध्ये वाढून १.९ लाखांवर पोहोचली. त्यानंतर २०२३ आणि २०२४ या दोन्ही वर्षांत ही संख्या थेट २ लाखांच्या पुढे गेली. पुढे २०२५ च्या अखेरीस हा आकडा झपाट्याने वाढून थेट २.५ लाखांच्या टापूत जाऊन पोहचला आहे. विशेष लक्षणीय आणि क्लेशदायक बाब म्हणजे, २०२५ या वर्षात प्रकरणांचा निकाल लावण्याच्या गतीत चक्क २२.३ टयांची मोठी घसरण नोंदवली गेली आहे. न्याय व्यवस्थेतील अनास्था आणि प्रशासकीय ढिसाळ कारभारावर ही आकडेवारी स्पष्ट बोट ठेवणारी आहे.

केंद्रीय मंत्र्यांची स्पष्ट कबुली आणि केंद्राची भूमिका संसदेमध्ये एका लेखी उत्तरात केंद्रीय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी ही सर्व वस्तुस्थिती, त्रुटी व आकडेवारी जाहीरपणे कबूल केली आहे. देशातील महिला व बालकांवरील अत्याचाराच्या वाढत्या आणि गंभीर घटनांना प्रभावीपणे आळा घालण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या या महत्त्वाच्या योजनेला आतापर्यंत केंद्र सरकारतर्फे दोनदा मुदतवाढ देण्यात आली आहे. सद्यस्थितीत ही योजना ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत कार्यरत ठेवण्यात आली आहे. सध्या देशातील एकूण २९ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या हद्दीत मिळून एकूण ७७५ फास्ट ट्रॅक विशेष न्यायालये कार्यरत आहेत, ज्यामध्ये तब्बल ३९८ विशेष 'ई-पॉक्सो' न्यायालयांचा समावेश आहे. या सर्व न्यायालयांच्या दैनंदिन आणि एकूण खर्चाचा संपूर्ण भार केंद्र आणि राज्य सरकारांमार्फत ६०:४० या निश्चित प्रमाणात उचलला जातो. यामध्ये प्रामुख्याने न्यायालयातील सन्माननीय न्यायमूर्ती व अधिकाऱ्यांचे वेतन, नियुक्त कर्मचाऱ्यांचा खर्च आणि अन्य दैनंदिन कामकाजाच्या खर्चाचा समावेश होतो.

राज्यांवर जबाबदारीचे खापर आणि यंत्रणेची वानवा न्यायदानातील या नको असलेल्या आणि टोकाच्या विलंबामुळे पीडित महिला, बालके व त्यांच्या कुटुंबीयांची मोठी मानसिक कोंडी होत असून त्यांना न्यायासाठी न्यायालयांच्या पायऱ्या झिजवत वणवण भटकण्याची वेळ आली आहे. केंद्रीय मंत्र्यांनी यावर स्पष्टीकरण देताना सांगितले की, देशातील सर्व उच्च न्यायालये आणि राज्य सरकारांना या संदर्भात वेळोवेळी अतिशय कडक निर्देश देण्यात आले आहेत. तरीसुद्धा, न्यायालयांमध्ये न्यायाधीशांची रिक्त असलेली पदे वेळेवर न भरणे आणि फास्ट ट्रॅक न्यायालयांच्या कामकाजात हवी ती गतिशीलता न आणणे ही मुख्यत्वे राज्य सरकारांची आणि संबंधित उच्च न्यायालयांची प्रशासकीय जबाबदारी असल्याचे सांगत केंद्राने याद्वारे एकप्रकारे आपली जबाबदारी झटकल्याचे दिसून येते.

या अत्यंत गंभीर आणि प्रलंबित समस्येवर वेळीच मात करण्यासाठी आता केवळ कागदी घोडे नाचवून किंवा केवळ योजनांचा दिखाऊ विस्तार करून चालणार नाही, तर प्रत्यक्षात जमिनीवर पायाभूत सुविधा आणि कुशल मनुष्यबळाची वानवा तातडीने दूर करणे गरजेचे झाले आहे. अन्यथा, कागदावर मोठ्या पाट्या लावून निर्माण केलेल्या 'फास्ट ट्रॅक' न्यायालयांच्या नावाखाली पीडितांना न्याय मिळण्याचा प्रवास असाच कायमस्वरूपी 'स्लो ट्रॅक'वर रखडत राहण्याची भीती निर्माण झाली आहे.

# हक्क आणि कर्तव्यांचा मेळ : खऱ्या स्वातंत्र्याची गुरुकिल्ली

**पान १ वरून कायदेविषयक क्षेत्राला विशेष जबाबदारी आहे. महा बार अँड बेंच स्किलिंग अँड एम्प्लॉयबिलिटी प्लॅटफॉर्म या उपक्रमाद्वारे आम्ही वर्गखोल्या आणि न्यायालयीन व्यवहार यांच्यातील अंतर कमी करत आहोत. या उपक्रमामुळे कायद्याचे पदवीधर वकिली, ड्राफ्टिंग आणि मध्यस्थी कौशल्यांनी सक्षम होतील आणि संपूर्ण वकील समाज एका ध्येयाखाली एकत्र येईल. परंतु ही जबाबदारी केवळ वकील किंवा कार्यकर्त्यांवरच राहू नये. केंद्र आणि राज्य सरकारांनी नागरिकांना त्यांच्या कर्तव्यांची जाणीव करून देण्यासाठी कार्यक्रम सुरू करणे आवश्यक आहे. शाळा-महाविद्यालयांमध्ये नागरी शिक्षण समाविष्ट करणे, जनजागृती मोहिमा राबवणे आणि प्रत्येक नागरिकाला एका किंवा दुसऱ्या प्रकारे कर्तव्य पार पाडणे बंधनकारक करणे ही धोरणे राबवली पाहिजेत. जसे मतदान हा नागरी कर्तव्य आहे, तसेच समाजनिर्माणात सक्रिय सहभाग ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असली पाहिजे.**

**स्वातंत्र्य ही संपलेली प्रकरण नाही, तर जिवंत जबाबदारी आहे. भारत खऱ्या अर्थाने स्वतंत्र तेव्हाच होईल जेव्हा प्रत्येक नागरिक वकील, विद्यार्थी, कामगार, ज्येष्ठ आपल्या कर्तव्यांचे पालन भारतमातेप्रती भक्तीभावाने करेल. तिरंगा तेव्हाच तेजस्वीपणे फडकेल जेव्हा हक्क आणि कर्तव्ये हातात हात घालून चालतील, जेव्हा स्वातंत्र्याला शिस्त साथ देईल आणि जेव्हा न्यायाला जबाबदारी बळ देईल.**

**जय हिंद. जय महाराष्ट्र.** ■■■

# जलदगती न्यायालये मंद का?

## पंचवीस वर्षांच्या प्रवासानंतरही ही न्यायालये सक्षम यंत्रणेच्या अभावी मंदपणे काम करीत आहेत; न्यायदानाच्या प्रक्रियेत सुधारणांची तातडीची गरज

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

देशाच्या पंतप्रधानांनी नुकतीच प्रश्नपत्रिका फुटीच्या (पेपर लीक) प्रकरणांसाठी जलदगती न्यायालये स्थापन करण्याची घोषणा केली, जी एकाएकी आलेल्या संस्थात्मक अपयशानंतर किंवा जनक्षोभानंतर दिले गेलेले उत्तर वाटते. जेव्हा जेव्हा एखादा गंभीर गुन्हा घडतो, तेव्हा जलदगती न्यायालयातून जलद न्याय मिळण्याची आश्वासने दिली जातात. मात्र, गेल्या २५ वर्षांच्या अनुभवावरून असे दिसून आले आहे की, न्यायालयाचा वेग हा पूर्णपणे त्याच्या सभोवतालच्या यंत्रणेवर अवलंबून असतो.

गेल्या अडीच दशकांत हा प्रयोग भारताच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रयोगांपैकी एक बनला आहे. प्रलंबित खटले पटपट निकाली काढण्याचा हा एक सुरुवातीचा प्रयत्न होता, जो आज दोन समांतर यंत्रणांमध्ये रूपांतरित झाला आहेएक सामान्य गुन्हे हाताळणारी आणि दुसरी विशेषतः बलात्कार आणि पोक्सो गुन्हे चालवणारी. एकत्र मिळून, जलदगती न्यायालये आणि विशेष जलदगती न्यायालये यांनी लाखो खटले निकाली काढले आहेत आणि यादरम्यान कोट्यवधी रुपयांचा खर्चही झाला आहे.

'जलद' म्हणजे नेमके किती वेगवान?

प्रत्येक स्वतंत्र मूल्यमापन, संसदीय पुनरावलोकन आणि न्यायालयीन निवाड्यामधून एकच गंभीर निष्कर्ष समोर आला आहेः न्यायालये तितक्याच वेगाने चालतात जितक्या वेगाने त्यांना पुरवठा करणाऱ्या यंत्रणा काम करतात. "ती रुळावरून घसरलेली नाहीत, जलदगती न्यायालये नाहीतच!" असे पुण्यातील वकील एस. बालन सांगतात, ज्यांना खटला चालवण्याचा अनेक दशकांचा अनुभव आहे. काही प्रकरणांमध्ये तर एका दशकाहून अधिक काळ खटले प्रलंबित आहेत. या प्रयोगाची सुरुवात २००० मध्ये झाली, जेव्हा ११ व्या वित्त



आयोगाने जुन्या आणि प्रलंबित खटला सत्रांचा सामना करण्यासाठी ५०२.९ कोटी रुपयांच्या केंद्रीय तरतुदीसह १,७३४ जलदगती न्यायालये स्थापन करण्याची शिफारस केली. ही न्यायालये तात्पुरत्या हस्तक्षेपाच्या रूपात कल्पिली गेली होती. जुने खटले जलदगतीने निकाली काढणे, हाच त्यांच्या यशाचा एकमेव निकष ठरवण्यात आला होता.

ही योजना केंद्र सरकारने २०११ मध्ये फंडिंग बंद करेपर्यंत अनेक वेळा वाढवण्यात आली. 'ब्रीज मोहन लाल विरुद्ध युनियन ऑफ इंडिया' या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, केंद्र सरकार जलदगती न्यायालये सुरू ठेवण्यास बांधील नाही, परंतु राज्यांना त्यांना त्यांच्या नियमित न्यायव्यवस्था पायाभूत सुविधांमध्ये सामावून घेण्याची मुभा दिली. या निकालानंतर हा प्रयोग बदलला. सुरुवातीला केंद्राद्वारे चालवला जाणारा हा प्रकल्प राज्यांच्या विविध स्तरांवरील निधी, मनुष्यबळ आणि कार्यक्षमतेनुसार विखुरलेला एक प्रकारचा तुकड्या जोडल्यासारखा प्रकल्प बनला.

दुसरा टप्पा दिल्लीतील सामूहिक बलात्कार प्रकरणानंतर सुरू झाला. न्यायमूर्ती वर्मा समितीच्या शिफारशीनुसार लैंगिक हिंसाचाराचे खटले चालवण्यासाठी समर्पित यंत्रणांची मागणी करण्यात आली. फौजदारी कायद्यातील दुरुस्त्या आणि त्यानंतर खटले जलद गतीने चालवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश यामुळे ऑक्टोबर २०१९ मध्ये अतिजलद न्यायालये योजनेची सुरुवात झाली. मूळ FTCS प्रमाणे, ज्यांची निर्मिती निर्भया निधीतून केवळ बलात्कार आणि पोक्सो प्रकरणांसाठी करण्यात आली होती, तशी ही नवी यंत्रणा नाही. आज ही दोन्ही ठिकाणे न्याय मंत्रालयाच्या अखत्यारीत समांतरपणे कार्यरत आहेत.

कागदावर पाहिल्यास ही यंत्रणा उत्तम काम करताना दिसते. २०२३ आणि २०२५ दरम्यान, FTCS ने ४०.२ लाखांहून अधिक खटले निकाली काढले. याच कालावधीत सुमारे २.३ लाख बलात्कार आणि पोक्सो खटलेही निकाली काढले गेले. ही आकडेवारी सरकारकडून विशेष न्यायालयांमुळे न्यायिक कार्यक्षमतेत सुधारणा झाल्याचे प्रमाण म्हणून वारंवार दिली जाते.

परंतु, खटला निकाली काढणे हा कार्यक्षमतेचा केवळ एक निकष आहे. कल्पना करा, एका न्यायालयात वर्षाला १,००० प्रलंबित खटले आहेत. जर न्यायालयाने एका वर्षात ३०० खटले निकाली काढले, तर त्याने आधीपेक्षा अधिक वेगाने काम केले आहे असे म्हणता येईल. मात्र, जर त्याच न्यायालयात वर्षाला नवीन ३२१ खटले दाखल होत असतील, तर प्रलंबित खटल्यांची संख्या कमी होण्याऐवजी वाढलीच आहे. जलदगती न्यायालये नेमके हेच घडवत आहेत. त्यांनी यंत्रणेची क्षमता नक्कीच वाढवली आहे, परंतु यामुळे खटले साचण्यामागील मूळ कारणांचे निराकरण झालेले नाही.

भारतीय लोक प्रशासन संस्थेच्या (IIPA) २०२३ च्या तृतीय-पक्ष मूल्यमापन अहवालातूनही हेच सत्य समोर आले आहे. FTSC योजना स्वतंत्र संस्था नव्हती, उलट अनेक न्यायमूर्तींकडे इतर न्यायालयांचा अतिरिक्त कार्यभार होता.

गेल्या २५ वर्षांतील सर्वात मोठा धडा म्हणजे जलदगती न्यायालये ही भारताच्या सुस्तावलेल्या न्यायव्यवस्था व्यवस्थेमधील केवळ एक तात्पुरती मलमपट्टी ठरली आहेत, जी न्यायदानाच्या मूळ पद्धतीमध्ये कोणताही मूलभूत बदल घडवून आणत नाहीत.

तज्ज्ञ वकिलांच्या मते, जलदगती न्यायालयांना तात्कालिक निर्णयांपेक्षा कायदेशीर पाठबळाची गरज असते. संसदेने त्यांची रचना, अधिकार आणि संसाधने योग्य कायद्याद्वारे निश्चित केली पाहिजेत. जोपर्यंत हे होत नाही, तोपर्यंत प्रत्येक नवीन जलदगती न्यायालय हे खऱ्या सुधारणेपेक्षा लोकांच्या संतापाला तात्पुरते उत्तर देण्याचा प्रयत्न ठरेल. या समस्येवर मात करण्यासाठी तपास यंत्रणा बळकट करणे, फॉरेन्सिक प्रयोगशाळांचा विस्तार करणे, खटला चालवणाऱ्या वकिलांची संख्या वाढवणे आणि असुरक्षित साक्षीदारांसाठी चांगल्या सुविधा निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. जोपर्यंत तपास, सरकारी वकील आणि फॉरेन्सिक क्षमतांमधील त्रुटी दूर होत नाहीत, तोपर्यंत केवळ न्यायालयांची संख्या वाढवून न्यायदानाच्या प्रक्रियेतील अडथळे दूर होणार नाहीत.

# चेकमध्ये फेरफार; ५ लाखांची रक्कम केली २ कोटी ५१ लाख!

## २१ वर्षांच्या प्रदीर्घ कायदेशीर लढाईनंतर पुणे न्यायालयात लागला निकाल; व्यावसायिकाला दोन वर्षांची शिक्षा

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

एका पाच लाखांच्या चेकवर अक्षरशः हातचलाखी करून तब्बल २ कोटी ५१ लाख रुपये लाटण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका व्यापाऱ्याला तब्बल २१ वर्षांनंतर शिक्षा झाली आहे. पुण्याच्या न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या खटल्याने न्यायव्यवस्थेतील प्रदीर्घ काळ चालणाऱ्या प्रक्रियेकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले आहे.

सन २००५ मधील ही घटना आहे. फिर्यादी असलेल्या सेसिलिया अँथनी पॉल, ज्या एक बांधकाम व्यावसायिक होत्या, त्यांनी आरोपी आर. पी. बनवारी (वय ६०) याला ५ लाख रुपयांचा चेक दिला होता. दरम्यान, चेकवर रक्कम लिहिताना त्यांनी एका मोठ्या चुकीची केली होती चेकवर अक्षरी रक्कम लिहिण्याची जागा रिकामी ठेवली होती.

या संधीचा गैरफायदा घेत आरोपी बनवारी याने चेकवर 'टू करोर्स फिफ्टी वन लाख ओन्ली' (दोन कोटी एकावन्न लाख रुपये फक्त) असे लिहिले. इतकेच नव्हे, तर चेकवर असलेल्या ५,००,००० या आकड्यांच्या आधी '२' आणि नंतर '१' असे अंक घुसवून ५ लाखांचे २ कोटी ५१ लाख रुपये केले. हा बनाव करण्यासाठी त्याने चेकच्या कोऱ्या जागेचा पुरेपूर वापर केला.



प्रातिनिधीक चित्र

जेव्हा हा चेक वटवण्यासाठी बँकेत सादर झाला, तेव्हा बँकेच्या अधिकाऱ्यांना चेकवरील आकड्यांमध्ये आणि लिखाणात विसंगती आढळली. बँकेने तत्काळ हा चेक नाकारून २ एप्रिल २००५ रोजी 'रिटर्न मेमो' जारी केला. फसवणुकीचा हा प्रकार लक्षात येताच, सेसिलिया पॉल यांनी येरवडा पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि गुन्हा दाखल केला.

**२१ वर्षे चाललेला संघर्ष**

या प्रकरणाचा तपास सुरू झाल्यानंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली, मात्र जामिनावर सुटका झाल्यानंतर हा खटला अनेक वर्षे न्यायालयात प्रलंबित राहिला. सुनावणीदरम्यान फिर्यादी सेसिलिया पॉल यांचे निधन झाले, परंतु त्यांच्या मुलांनी हा कायदेशीर लढा सुरूच ठेवला. बचाव पक्षाने असा दावा केला होता की, हा व्यवहार एका मालमत्ता खरेदी-विक्रीचा भाग होता आणि त्यासाठी मे २००४ मध्ये एक करारनामा झाला होता. मात्र, फिर्यादीच्या वकिलांनी आणि पुराव्यांनी हा करारनामा बनावट असल्याचे सिद्ध केले.

या खटल्यात फॉरेन्सिक हस्तलेखन तज्ज्ञाचा अहवाल निर्णायक ठरला. तज्ज्ञांनी चेकवरील शाई, पेनाचा दाब, लिखाणाचा क्रम आणि अक्षरांची वळणे यांचा सखोल अभ्यास केला. तपासणीत असे समोर आले की, चेकवर '२' आणि '१' हे अंक नंतरच्या काळात मुद्दाम जोडण्यात आले होते. या तांत्रिक पुराव्यामुळे आरोपीचा गुन्हा स्पष्ट झाला.

न्याय दंडाधिकारी (प्रथम वर्ग) एन. एस. बारी यांनी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आरोपीला फसवणूक, विश्वासघात आणि कागदपत्रे बनावट केल्याप्रकरणी दोषी ठरवले. २१ वर्षांच्या प्रदीर्घ कायदेशीर लढाईनंतर न्यायालयाने आरोपीला दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

## अल्पवयीन सहकाऱ्यावर अत्याचार अभिनेत्याला १० वर्षे सक्तमजुरी

नोव्हेंबर २०२० मध्ये एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लॉजमध्ये बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी एका २४ वर्षीय अभिनेत्याला न्यायालयाने दहा वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. विशेष न्यायाधीश एस. एम. ताकपिरे यांनी डीएनए पुराव्यांच्या आधारे हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे.

अभियोजन पक्षाच्या माहितीनुसार, पीडित मुलगी आणि आरोपी अभय शिवाजी बनसोडे एकाच चित्रपटात सहकलाकार म्हणून काम करत होते, यादरम्यान त्यांची ओळख झाली होती. चित्रीकरणादरम्यान त्यांची जवळीक वाढल्यानंतर आरोपीने तिला भेटण्यासाठी आणि फोनवर संपर्क साधण्यास सुरुवात केली. १३ नोव्हेंबर २०२० रोजी आरोपीने पीडित तरुणीला हडपसर येथे बोलावून घेतले आणि तिच्या विरोध डावलून तिला एका लॉजवर नेले. तेथे त्याने तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. घटनेनंतर पीडितेने हडपसर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली होती, त्यानंतर तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

या खटल्याच्या सुनावणीदरम्यान विशेष न्यायालयाने फॉरेन्सिक पुराव्यांना अत्यंत विश्वसनीय आणि ग्राह्य मानले. रक्ताने माखलेल्या टॉवेलवरील वीर्याचे डाग आरोपी अभय बनसोडे यांच्या डीएनए प्रोफाइलशी तंतोतंत जुळले, तर बेडशीटवरील रक्ताचे डाग पीडितेच्या डीएनएशी जुळल्याचे निष्पन्न झाले. याशिवाय पीडितेची साक्ष, वैद्यकीय अहवाल, लॉजमधून जप्त केलेले कपडे आणि कॉल रेकॉर्ड्स (ज्यामध्ये घटनेच्या दिवशी आरोपीने ११ वेळा फोन केल्याचे स्पष्ट झाले) या सर्व पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले.

# न्यायालयात आरोपींचे हॉटेलिंग,नशेखोरी?

## पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांचे शिवाजीनगर न्यायालयात सुरक्षा ऑडीट चे निर्देश

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

शिवाजीनगर न्यायालय परिसरातून एक अत्यंत धक्कादायक बाब समोर आली आहे. न्यायालयात हजर करण्याच्या नावाखाली आरोपींकडून सुरू असलेल्या मनमानी कारभाराला आणि 'टुरिझम'ला आळा घालण्यासाठी पुणे पोलिसांनी आता अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. न्यायालय परिसरात आरोपींना मिळणारी अवाजवी मोकळीक, नातेवाईकांसोबत होणाऱ्या बिनधास्त भेटी आणि अगदी हॉटेलमधून जेवण मागवण्यासारखे प्रकार आता पोलिसांच्या रडारवर आले आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी सुरक्षेचा तातडीने आढावा घेत कडक निर्देश जारी केले आहेत.

**आरोपींच्या 'टुरिझम'ला पायी 'ब्रेक'**

न्यायालयात तारीख व सुनावणीच्या निमित्ताने येणाऱ्या कैद्यांना किंवा आरोपींना कायद्याचा धाक राहिला नसल्याचे चित्र दिसत आहे. आरोपींना न्यायालयात आणणे म्हणजे जणू काही त्यांच्यासाठी एक 'पर्यटन'च बनल्याची खंत पोलीस प्रशासनाने व्यक्त केली आहे. या संदर्भात बोलताना पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी स्पष्ट केले की, आरोपींना न्यायालयात आणण्याची प्रक्रिया त्यांच्यासाठी पर्यटन ठरू नये, यासाठी प्रशासन पूर्णपणे प्रयत्नशील आहे. आरोपींना थेट कोर्टात हजर करून तात्काळ पुन्हा कारागृहात किंवा पोलीस कोठडीत हलवले जाईल. या प्रक्रियेत पोलिसांशिवाय इतर कोणालाही आरोपींच्या संपर्कात येण्याची परवानगी दिली जाणार नाही.




**शौचालयात गांजा पुरवल्याची घटना उघड**

काही दिवसांपूर्वीच न्यायालयाच्या परिसरातील शौचालयात एका आरोपीला त्याच्या मित्राने गांजा पुरवल्याची गंभीर घटना उघडकीस आली होती. या घटनेमुळे न्यायालयीन सुरक्षेतील प्रचंड त्रुटी चव्हाट्यावर आल्या. आरोपी मोबाईलवर गप्पा मारणे, वाहनांमध्ये बसून वेळ घालवणे, सोशल मीडियासाठी रील्स तयार करणे आणि अगदी अमली पदार्थांची देवाणघेवाण करणे असले प्रकार करत असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

**सुरक्षा व्यवस्थेत होणार मोठे बदल**

व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा वापर: सुरक्षेवरील ताण कमी करण्यासाठी आणि आरोपींची अनावश्यक ये-जा थांबवण्यासाठी अधिकाधिक सुनावण्या दृकश्राव्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) घेण्यावर भर दिला जाणार आहे.

**कडक तपासणी:** मेट्रोचे काम आणि इतर कारणांमुळे सुरक्षेत जी शिथिलता आली होती, ती तातडीने दूर केली जात असून आता प्रवेशद्वारावर प्रत्येकाची कसून तपासणी केली जाईल.

**झीरो टॉलरन्सः** न्यायालय परिसरात पान, तंबाखू, गुटखा, अमली पदार्थ किंवा कोणतीही संशयास्पद वस्तू आणण्याचा प्रयत्न केल्यास तो अजिबात खपवून घेतला जाणार नाही, असा कडक इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

यापूर्वी चतुःशृंगी, कोथरूड आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्यांमध्ये खुनाचा प्रयत्न व विनयभंगासारखे गंभीर गुन्हे दाखल असलेला सराईत आरोपी अनमोल जाधवराव (वय ३६) याला १९ जुलै २०२५ रोजी न्यायालयीन सुनावणीसाठी शिवाजीनगर न्यायालयात आणण्यात आले होते. न्यायालयाने त्याला एका खटल्यात शिक्षा सुनावताच, तो संधी साधून न्यायालयाच्या आवारातील गर्दीतून पसार झाला.

या घटनेनंतर पोलिसांनी शोधमोहिम राबवली असता, हा आरोपी पोलिसांना सतत गुंगारा देत असल्याचे समोर आले. दूरचित्रवाहिनीवरील (टीव्ही) गुन्हेगारी मालिका पाहून तो आपली वेशभूषा बदलत असे आणि सातत्याने वास्तव, तसेच राहण्याचे ठिकाण बदलून पोलिसांची दिशाभूल करत होता. अखर कसून तपास केल्यानंतर पोलिसांनी त्याला अहिल्यानगरमधून वाघोलीकडे मोटारीतून येत असताना जेरबंद केले. त्याच्यासोबत असणारा अक्षय हंपे (वय ३०) या अन्य एका साथीदारालाही पोलिसांनी गजाआड केले आहे.

**पूर्वीच्या घटना आणि सुरक्षेपुढील आव्हाने**

फक्त हाच नव्हे, तर यापूर्वीही १९ मार्च २०२३ रोजी शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालयाच्या आवारातून एका वॉरंटमधील आरोपी दीपक शिवाजी जाधव (वय २८) याने न्यायालयातून सुनावणीदरम्यान पळ काढत चक्क वीस फूट उंचीवरून उडी मारून पसार होण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, तिथे उपस्थित असलेल्या सतर्क पोलीस हवालदार सचिन शिंदे आणि इतर बंदोबस्तावरील कर्मचाऱ्यांनी धाव घेऊन त्याला पुन्हा शिताफीने पकडले होते.

# बिल्डर मृत पावल्यास फ्लॅटचे ताबे देण्याची जबाबदारी वारसांची

## राष्ट्रीय ग्राहक आयोगाचा निकाल, पुणे येथील 'शेळके सदन' प्रकरणात ग्राहकांना सहा आठवड्यात ताबा देण्याचे आदेश

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

घर खरेदीदारांना फ्लॅटचा ताबा देण्याच्या आणि त्यांची कायदेशीर देणी पूर्ण करण्याच्या जबाबदारीपासून मृत विकासकाच्या कायदेशीर वारसांना कसल्याही प्रकारचा पळ काढता येणार नाही, असा अतिशय महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगाने (NCDRC) दिला आहे. पुण्याच्या सदाशिव पेठेतील 'शेळके सदन' या गृहप्रकल्पातील दोन घर खरेदीदारांना आगामी सहा आठवड्यांच्या आत फ्लॅटचा ताबा देण्याचे स्पष्ट निर्देश आयोगाने मृत विकासकाच्या वारसांना सुनावले आहेत.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी आहे की, मूळ विकासक संजीव उद्धवराव शेलके हे प्रकल्पाचे बांधकाम सुरू असताना एप्रिल २०१५ मध्ये निधन पावले होते. त्यानंतर त्यांच्या कायदेशीर वारसांनी या प्रकल्पाचे संपूर्ण नियंत्रण आपल्या हातात घेतले होते. या प्रकल्पातील दोन ग्राहकांना अनुक्रमे जून २०१५ आणि एप्रिल २०१६ पर्यंत फ्लॅटचा ताबा मिळणे बंधनकारक होते. त्यासाठी या खरेदीदारांनी अनुक्रमे ८० लाख आणि ८७ लाखांच्या ठरलेल्या एकूण रकमेपैकी तब्बल ७९.५२ लाख आणि ६६.६५ लाख रुपयांइतकी मोठी रक्कम आधीच संबंधित विकासकाला अदा केली होती.




परंतु, विकासकाच्या मृत्यूनंतर वारसांनी असा दावा केला होता की, खरेदीदारांनी भरलेल्या या रकमेबाबत आम्हाला कोणतीही पूर्वकल्पना किंवा माहिती नव्हती. तसेच, विक्रीचे करार रद्द करण्यासाठी आणि इतर संबंधित मागण्यांसाठी दिवाणी न्यायालयात दावे प्रलंबित आहेत, असा बचावात्मक युक्तिवाद वारसांतर्फे पुढे करण्यात आला. मात्र, राष्ट्रीय ग्राहक आयोगाने हा युक्तिवाद पूर्णपणे फेटाळून लावला. मूळ विकासकाच्या निधनानंतर त्यांच्या कायदेशीर वारसांनीच या प्रकल्पाचे नियंत्रण स्वेच्छेने हाती घेतले होते, पुढे बांधकाम सुरू ठेवले होते आणि इतकेच नव्हे तर एका नवीन तक्रारदारासोबत विक्रीचा कायदेशीर करारही केला होता. त्यामुळे, ज्यांनी आधीच प्रकल्पांतर्गत अधिकार मान्य केले आहेत, ते वारसदार एकाच वेळी स्वतःवरील कायदेशीर दायित्वांना आणि जबाबदाऱ्याना नाकारू शकत नाहीत, असे न्यायपीठाने आपल्या आदेशात अगदी स्पष्टपणे नमूद केले.

न्यायमूर्ती सुदीप अहलूवालिया आणि प्रिसिडिंग मेंबर साधना शेंगर यांच्या सामाईक न्यायपीठाने या प्रकरणात स्पष्ट केले की, जर कोणत्याही कारणास्तव निर्धारित मुदतीत फ्लॅटचा ताबा देणे अशक्य किंवा तांत्रिकदृष्ट्या शक्य नसेल, तर पर्यायी व्यवस्था म्हणून वारसांनी ग्राहकांची जमा केलेली संपूर्ण मूळ रक्कम त्यावर ९ टक्के इतक्या सरळ साध्या व्याजासह (रक्कम भरल्याच्या मूळ तारखेपासून ते प्रत्यक्ष वसुलीच्या दिनांकापर्यंत) विनाविलंब परत करावी लागेल. तसेच, या कायदेशीर लढाईत नाहक त्रास सहन करावा लागलेल्या तक्रारदारांना खटला खर्चापोटी प्रत्येकी ५० हजार रुपयांची अतिरिक्त रक्कम अदा करण्याचे सक्तीचे आदेशही आयोगाने दिले आहेत.

या संपूर्ण सुनावणीदरम्यान वारसांतर्फे असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, हे सर्व संबंधित खटले आता कालमर्यादेबाह्य (कालबाह्य) झाले आहेत आणि ते टिकण्यासारखे नाहीत. परंतु, राष्ट्रीय ग्राहक आयोगाने हा मुद्दा देखील फेटाळून लावला. कायदेशीर ताबा हस्तांतरित करण्यामध्ये झालेली कसूर ही केवळ एका दिवसाची नसून ती दररोज घडणारी आणि सातत्याने सुरू राहणारी एक कायदेशीर प्रक्रिया म्हणजेच 'कंटीन्यूइंग कॉज ऑफ एक्शन' आहे, असे आयोगाने स्पष्ट केले. प्रकल्पाच्या मूळ कराराची मुदत संपली किंवा विकासकाचे निधन झाले म्हणून विकासकाच्या प्रकल्प पूर्ण करण्याच्या आणि ग्राहकांना हक्काचा ताबा देण्याच्या मूलभूत आणि कायदेशीर दायित्वाला पूर्णपणे मुक्ती मिळत नाही. शिवाय, दिवाणी न्यायालयांमध्ये अन्य दावे प्रलंबित आहेत या एकमेव कारणावरून घर खरेदीदारांना ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत योग्य ती दाद मागण्यापासून रोखता येणार नाही, कारण ग्राहक मंचासमोरील कायदेशीर बाबी आणि दिवाणी दावे हे पूर्णपणे भिन्न आहेत, असे सांगत आयोगाने हा निकाल दिला. दरम्यान, तक्रारदारांचे कायदेशीर प्रतिनिधित्व करणारे वकील मिलिंद महाजन यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, हा न्यायालयाचा आदेश आगामी सहा आठवड्यांच्या आत तंतोतंत लागू करायचा आहे, आणि अद्याप आमच्या अशिलांना फ्लॅटचा प्रत्यक्ष ताबा मिळालेला नाही, त्यामुळे बिल्डरच्या पुढील कायदेशीर पर्यायांवर लक्ष ठेवून आम्ही सुप्रीम कोर्टात योग्य ती कायदेशीर कारवाई किंवा कॅव्हेट दाखल करण्याच्या अनुषंगाने विचार करत आहोत.

# 'बार कौन्सिल'साठी हवी २० वर्षांच्या प्रॅक्टीसची अट

## महिलांना ३३ टक्के आरक्षण आणि ज्युनिअर वकिलांना स्टायपेंड देण्यासाठी 'जन अदालत'ची आक्रमक भूमिका

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

देशातील वकिलांच्या कल्याणासाठी आणि न्यायव्यवस्था अधिक पारदर्शक करण्यासाठी 'ॲडव्होकेट ॲक्ट १९६१' मध्ये तातडीने महत्त्वपूर्ण दुरुस्त्या कराव्यात, अशी आक्रमक आणि सर्वसमावेशक मागणी 'जन अदालत' या अग्रेसर संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे. बार कौन्सिल ऑफ इंडियाने (BCI) सर्व राज्यांकडून ॲडव्होकेट ॲक्टमधील दुरुस्त्या व सूचनांसाठी १८ जुलै २०२६ रोजी एक परिपत्रक जारी केले होते. येत्या हिवाळी अधिवेशनात यावर चर्चा होऊन दुरुस्ती विधेयक पारित होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, 'जन अदालत'च्या रिसर्च टीमने आणि तज्ज्ञ पदाधिकाऱ्यांनी सखोल अभ्यास करून या कायद्यात कराव्याच्या ११ अत्यंत महत्त्वाच्या शिफारसी बीसीआयकडे पाठवल्या आहेत.

'जन अदालत' संस्था नेहमीच विविध कायद्यांमध्ये सुधारणा सुचवण्यासाठी अग्रेसर राहिली आहे. संस्थेच्या नुकत्याच पार पडलेल्या विशेष बैठकीत वकिलांच्या हिताचे रक्षण करणाऱ्या या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.




**कायद्यातील प्रमुख मागण्या आणि सूचना:**

- **जिल्हानिहाय प्रतिनिधित्व:** बार कौन्सिल सदस्यांची संख्या जिल्हानिहाय असावी आणि प्रत्येक जिल्ह्यातून एक प्रतिनिधी निवडला जावा.
- **पात्रता निकष:** बार कौन्सिलच्या निवडणुकीसाठी उमेदवारास किमान २० वर्षांची प्रॅक्टीस असण्याची सक्तीची मर्यादा असावी.
- **महिला आरक्षण:** महिला वकिलांना सर्व स्तरांवर ३३ टक्के आरक्षण देण्याची तरतूद करावी.
- **पारदर्शक निवडणूक:** निवडणूक प्रक्रिया अत्यंत पारदर्शक राहावी यासाठी स्वतंत्र नियमावली असावी. बोगस मतदान रोखण्यासाठी आणि मतमोजणीतील फेरफार टाळण्यासाठी कठोर नियम करून दोषींना शिक्षेची तरतूद करावी.
- **वकिलांवरील तक्रारींची छाननी:** वकिलांवर किंवा पक्षकारांकडून होणाऱ्या तक्रारींची सत्यता तपासण्यासाठी एक स्वतंत्र 'स्क्रिनिंग यंत्रणा' असावी, जेणेकरून खात्री पटल्यानंतरच तक्रार दाखल करून घेतली जाईल.
- **पोलिस कारवाईपूर्वी पडताळणी:** पोलिसांकडे येणाऱ्या वकिलांच्या तक्रारींची शहानिशा झाल्याशिवाय आणि बार कौन्सिल सदस्य किंवा स्क्रिनिंग कमिटीकडून पडताळणी झाल्याशिवाय वकिलावर गुन्हा दाखल करू नये.
- **ज्युनिअर वकिलांना स्टायपेंड:** नवोदित ज्युनिअर वकिलांना सुरुवातीची ५ वर्षे बार कौन्सिल आणि स्थानिक राज्य सरकारने एकत्रितपणे दरमहा स्टायपेंड द्यावा.
- **सन्मान निधी:** वयाच्या ६० वर्षानंतरच्या ज्येष्ठ वकिलांना राज्यस्तरीय बार कौन्सिलमार्फत 'सन्मान निधी' सुरू करावा.
- **पायाभूत सुविधा:** सर्व न्यायालयांमध्ये वकिलांसाठी व पक्षकारांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बार कौन्सिलने शासनाकडे पाठपुरावा करणे बंधनकारक करावे.
- **विमा योजना:** वकिलांसाठी सर्वसमावेशक आणि पारदर्शक विमा पॉलिसी योजना लागू करावी.
- **नोंदणी शुल्क कपात:** बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा तसेच बार कौन्सिल ऑफ इंडियाकडे नवोदित वकिलांना भरावे लागणारे प्रस्तावित नोंदणी शुल्क तातडीने कमी करावे.

या महत्त्वपूर्ण सूचनांच्या मसुद्यावर ॲड. सागर नेवसे, ॲड. अविनाश पाठक, ॲड. प्रवीण तांबवेकर, ॲड. देवेंद्र पाटील आणि ॲड. स्वाती चौधरी यांनी बैठकीत सविस्तर चर्चा करून अंतिम रूप दिले. त्यानंतर या सर्व मागण्यांचा प्रस्ताव २ ऑगस्ट २०२६ रोजी अधिकृतपणे बार कौन्सिल ऑफ इंडियाकडे पाठवण्यात आला आहे. वकिलांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि संरक्षणासाठी शासनाने या दुरुस्त्यांचा गांभीर्याने विचार करावा, अशी अपेक्षा 'जन अदालत'चे अध्यक्ष ॲड. सागर नेवसे यांनी व्यक्त केली आहे.

# पत्नीवर हल्ला करणाऱ्या सात वर्षे कारावास

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिच्या डोक्यात लोखंडी हातोड्याने वार करत जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या पतीला बारामती येथील मे. जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश सौ. श्रीमती एस. आर. पाटील यांनी ७ वर्षे सश्रम कारावास आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

दिनांक १५ जुलै २०२० रोजी आरोपी विलास दादा नेटके (रा. सहजपूर, ता. दौंड, जि. पुणे) याने त्याची पत्नी ललीता विलास नेटके हिच्या चारित्र्याबद्दल संशय घेतला. या संशयातून तिची विक्षिप्त मार्गाने विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने तिच्या डोक्याच्या उजव्या बाजूस हातातील लोखंडी हातोड्याने जबर दुखापत करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. याप्रकरणी यवत पोलीस स्टेशनमध्ये आप्पा सुदाम सकट यांनी आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली होती. या गुन्ह्याचा तात्कालीन तपास अधिकारी एन. एस. लकडे यांनी सखोल तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

सदर खटल्यामध्ये सरकार पक्षातर्फे एकूण ०९ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये जखमी पत्नी ललीता नेटके, मुलगा सुमेश आणि डॉक्टर शलाका लोणकर यांची साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरली. सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील सुनील ईश्वर वसेकर यांनी प्रभावी युक्तिवाद केला.

# डबल डिलाईट! एकाच दिवशी मिळाले दोन विजय!

*ॲड. गीतांजली कडते या पुण्यात वकील म्हणून प्रॅक्टीस करत असून, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि युनियन बँक ऑफ इंडियाच्या पॅनेल ॲडव्होकेट म्हणूनही कार्यरत आहेत. सुप्रीम कोर्टाच्या सर्टिफाईड मीडिएटर असण्यासोबतच सामाजिक जाणिवेतून त्यांनी 'गीतांजली सोशल फाउंडेशन'ची स्थापना केली आहे. त्याद्वारे विविध सामाजिक उपक्रम राबवतात.*
***ॲड. गीतांजली कडते** नुकतेच कॉलेज संपून पहिल्यांदाच कोर्टात उतरल्या तेव्हा एका साध्या ज्युनिअर वकिलासाठी तो काळ मोठा कसोटीचा होता. एकाच दिवशी त्यांच्यासमोर दोन पूर्णपणे वेगळी प्रकरणे आलीएक जिल्हा न्यायालयातील दिवाणी अपील आणि दुसरे कौटुंबिक न्यायालयातील घटस्फोटाचे प्रकरण. त्या एकाच दिवसात मिळालेल्या दोन विजयांनी आणि अनुभवांनी त्यांच्या संपूर्ण करिअरला आणि आयुष्याला एक नवी दिशा दिली.*






**ॲड. गीतांजली कडते**

**पहिले प्रकरण: शाळा आणि जनावरांच्या शेडचा कायदेशीर वाद**

पहिले प्रकरण एका नामांकित शाळा आणि एका परवानाधारक जनावरांच्या शेडचा मालक यांच्यातील अत्यंत गुंतागुंतीच्या कायदेशीर वादाचे होते. ट्रायल कोर्टात तो खटला माझा पक्षकार पूर्णपणे हरला होता. त्या शेडच्या मालकाकडे सर्व अधिकृत परवानग्या असतानाही, शेजारी शाळा आल्यामुळे त्याच्या रोजगारावर आणि अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. खालच्या कोर्टात बाजू कमजोर पडल्यामुळे पक्षकार पूर्णपणे निराश झाला होता.

अशातच माझ्या सिनिअर वकिलांनी तो फाईलचा मोठा डोंगर माझ्या टेबलवर ठेवला आणि अचानक एका दिवशी मला अत्यंत सहजपणे सांगितले की हे अपील आता मलाच युक्तिवाद करून चालवायचे आहे. ते शब्द ऐकून माझ्या पायाखालची जमीनच सरकली. मी मनातल्या मनात विचार करू लागले की, ज्या प्रकरणात माझ्यापेक्षा सीनिअरही हरलेत, तिथे माझ्यासारखी अनुनभवी ज्युनिअर ते कठीण अपील कशी लढवणार? पण माझ्या सिनिअरचा माझ्यावरील तो दृढ विश्वासच माझी सर्वात मोठी ताकद बनला. त्यांनी माझ्यावर जो भरोसा दाखवला, त्याने मला आतून हलवून सोडले आणि एक नवीन उमेद दिली.

मी त्या फाईलचे पानोपान अक्षरशः पाठ करून टाकले होते. झोप उडवणारे ते दिवस आणि रात्री आजही माझ्या मनातून जात नाहीत. कोर्टात पोहोचल्यावर मला समजले कि नुसता अभ्यास चालत नाही, तर आधी बऱ्याच कायदेशीर प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. जेव्हा शेवटी माझा नंबर

> ***"एक सीनियर वकिल ज्या प्रकरणात आधीच हरला होता, ते अपील माझ्यासारख्या नवशिक्या ज्युनिअरने लढवावे, असा विश्वास माझ्यावर दाखवला गेला. त्या एका विश्वासाने माझे संपूर्ण आयुष्य आणि दृष्टिकोन बदलून टाकले."***

आला, तेव्हा माझा संपूर्ण थरकाप उडाला होता. सिनिअरनी न्यायाधीशांची औपचारिक ओळख करून देत विनंती केली की मला युक्तिवाद करू द्यावा. माननीय न्यायाधीशांनी संमती दिली, पण त्यानंतर त्यांच्या प्रश्नांचा जो भडिमार सुरू झाला, तो एखाद्या कठीण परीक्षेसारखाच होता.

त्या वादाचा मूळ मुद्दा अत्यंत साधा पण कायदेशीरदृष्ट्या महत्त्वाचा होताएखादी शाळा बाजूला आली म्हणून कायदेशीर परवानगी घेऊन कायदेशीर व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीला त्याच्या रोजगारापासून वंचित ठेवले जाऊ शकते का? मी न्यायाधीशांसमोर युक्तिवाद करताना एक अगदी व्यावहारिक आणि साधे उदाहरण दिले, जे आजसुद्धा लोक लक्षात ठेवून कौतुक करतात. मी आत्मविश्वासाने म्हटले, "माय लॉर्ड, शेडमधील गाई-म्हशी काही कंपाऊंड वॉल उडी मारून शाळेत जाणार नाहीत!" दोन्ही बाजूंना एक भक्कम भिंत असताना हा युक्तिवाद अत्यंत तंतोतंत बसला.

त्या एका साध्या, कॉमन सेन्सच्या मुद्द्याने न्यायालयाचे मन जिंकले. आणि जेव्हा अपील मंजूर होऊन निकाल माझ्या बाजूने लागला, तेव्हा मला समजले कि वकिलीत अनुभवापेक्षा तुमची तयारी, प्रत्येक मुद्द्यातील स्पष्टता आणि प्रामाणिकपणा जास्त महत्त्वाचा असतो.

**दुसरे प्रकरण: संवेदनशील घटस्फोटाचा दावा**

दुसरीकडे, मी एका अत्यंत कठीण आणि क्लिष्ट घटस्फोटाच्या प्रकरणावरही एकाच वेळी काम करत होते. एकीकडे संविधानिक आणि दिवाणी कायदे समजून घेत असताना, दुसरीकडे मानवी भावनांच्या गुंतागुंतीशी मला सामना करावा लागत होता. तो पती-पत्नीचा वाद अतिशय विकोपाला गेला होता; पतीला आपले आयुष्य नवीन

> ***"ती महिला कोर्टाबाहेर अश्रू ढाळत आली आणि तिने मला प्रेमाने ५०० रुपयांची नोट दिली. ती नोट माझ्या वकिलीच्या प्रवासातील आजवरची सर्वात मोठी कमाई आणि नेहमी जपून ठेवलेली अनमोल पावती आहे."***

मार्गाने पुढे न्यायचे होते, तर कौटुंबिक व सामाजिक दबावामुळे नाते पूर्णपणे संपुष्टात येत होते. दोन्ही बाजूंनी अनेक प्रयत्न करूनही जेव्हा तडजोड शक्य झाली नाही, तेव्हा कायदेशीर लढा अनिवार्य ठरला.

मी त्या पती-पत्नीच्या किंवा कुटुंबाच्या वादात तासनतास समेट घडवण्याचा किंवा कायदेशीर बाजू समर्थपणे मांडण्याचा प्रयत्न करत होते. त्या खटल्यात कायदेशीर मुद्द्यांपेक्षा मानसिक ताणतणाव आणि संवेदनशीलता जास्त हाताळावी लागत होती.

आणि खऱ्या अर्थाने योगायोग असा घडला कि, त्या दोन्ही भिन्न प्रकरणांचे निकाल अगदी एकाच दिवशी माझ्या बाजूने लागले!

अपील मंजूर झाले आणि घटस्फोटाचा दावाही माझ्या पक्षकाराला अनुकूल असा सुटला. कोर्टाबाहेर आल्यावर त्या घटस्फोट झालेल्या पुरुष अशिलाची आई डोळ्यांत अश्रू आणत माझ्याकडे धावत आली. तिने माझे दोन्ही हात हातात घेतले, मला भरभरून आशीर्वाद दिले आणि तिच्या पर्समधून काढून एक ५०० रुपयांची नोट माझ्या हातात जबरदस्तीने सरकवली. मी ती नाकारण्याचा प्रयत्न केला असता ती प्रेमाने म्हणाली, "ही फी म्हणून नाही तर तुझी आईच समजून आशीर्वाद म्हणून ठेव!" मी ती पाचशे रुपयांची नोट आजही अतिशय जपून ठेवली आहे, कारण ती मला माझ्या वकिलीचे खरे आणि सर्वोच्च मूल्य शिकवून जाते.

दुसऱ्या दिवशी तो शेडचा मालक माझ्या ऑफिसमध्ये पेढे घेऊन आला, आणि खऱ्या अर्थाने त्याच्या जनावरांच्या मूक आशीर्वादांशिवाय तो आनंद अपूर्ण राहिला असता. त्या दोन्ही घटनांनी मला शिकवले की, पक्षकार तुमचं कायदेशीर कलमी भाषण कधीतरी विसरू शकतात, पण जेव्हा त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळायची होती, तेव्हा तुम्ही त्यांच्या पाठीशी कसे खंबीरपणे उभे राहिलात, हे ते कधीही विसरत नाहीत. वकिली म्हणजे फक्त पुस्तकी कायदेतज्ज्ञ असणे नव्हे, तर माणसांचे दुःख जवळून समजून घेण्याची एक अतिशय संवेदनशील कला आहे.

**शब्दांकन : ॲड. रुची मेमाणे** ■■■

# भारतीय मानकांनुसार नसलेले हेल्मेट विकू नका

## मुंबई उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय; फौजदारी कारवाई मागे घेण्याचे निर्देश

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

भारतीय मानके गुणवत्ता नियंत्रण आदेश, २०२० अंतर्गत निर्धारित केलेल्या भारतीय मानकांचे पालन न करणारे हेल्मेट, १ जून २०२१ नंतर विक्री किंवा वापरण्यासाठी परवानायोग्य नाहीत, असा अत्यंत महत्त्वाचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे, जरी ते हेल्मेट त्या तारखेपूर्वी आयात केले गेलेले असले तरीही. न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजूषा देशपांडे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. तथापि, न्यायालयाने जप्त केलेले हेल्मेट काही अटींच्या अधीन राहून याचिकाकर्त्याला परत करण्यास परवानगी दिली आहे, परंतु ते बाजारात विकता येणार नाहीत.

'प्रोजेक्ट रिव्हल्ट एलएलपी' या भागीदारी फर्मने दाखल केलेल्या याचिकेवर ही सुनावणी झाली. ही फर्म वेगवेगळ्या देशांतून आयात केलेल्या मोटारसायकल रायडिंग गिअरसह सुरक्षात्मक हेल्मेट विकण्याचा व्यवसाय करते. या फर्मने ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्स (BIS) द्वारे सुरू असलेल्या फौजदारी कारवाईला आणि हेल्मेट जप्तीच्या कारवाईला आव्हान दिले होते.

याचिकाकर्त्या कंपनीने असा युक्तिवाद केला होता की, त्यांनी आयात केलेले हेल्मेट हे मोटारसायकलच्या किमान सुरक्षेसाठी असलेल्या युरोपियन मानकांचे पालन करतात, जी मानके भारतीय मानकांपेक्षा अधिक कडक आहेत. त्यामुळे, बीआयएस कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याचे कारण दाखवून हेल्मेट जप्त करण्याची कारवाई अन्यायकारक होती. तसेच, हे हेल्मेट गुणवत्ता नियंत्रण आदेश लागू होण्याच्या म्हणजेच १ जून २०२१ पूर्वीच आयात करण्यात आले होते, असा दावाही करण्यात आला.



न्यायालयाने स्पष्ट केले की, बीआयएस कायदा, २०१६ अंतर्गत प्रमाणकाशिवायआणि वैध परवान्याशिवाय कलम १६ अंतर्गत येणाऱ्या वस्तूंची निर्मिती, आयात, वितरण, विक्री, साठवणूक किंवा विक्रीसाठी प्रदर्शन करण्यास सक्त प्रतिबंध आहे. या गुणवत्ता नियंत्रण आदेशाचा मुख्य उद्देश दुचाकीस्वाराला अपघात झाल्यास मृत्यूचा धोका कमी करणे आणि डोक्याला गंभीर दुखापत होऊ नये याची खात्री करणे हा आहे, असे न्यायालयाने नमूद केले.

याचिकाकर्त्यांच्या मागणीवर न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या 'एम.सी. मेहता विरुद्ध युनियन ऑफ इंडिया' या खटल्यातील निकालाचा संदर्भ दिला. बीएस-३ वाहनांच्या विक्रीवरील प्रतिबंधाच्या प्रकरणाचा दाखला देत न्यायालयाने स्पष्ट केले की, जुना स्टॉक संपवण्याचे कारण देऊन निकषांविना वस्तूंची विक्री करण्यास मुभा दिली जाऊ शकत नाही. त्यानुसार, याचिकाकर्त्यांचे हेल्मेट बाजारात विकण्याची परवानगी देण्याचे प्रकरण पूर्णपणे फेटाळण्यात आले.

दरम्यान, बीआयएसने न्यायालयाला सांगितले की, जर हे हेल्मेट बाजारात विक्रीसाठी परवानगी दिली जात नसेल, तर कायद्यानुसार शक्य असल्यास संबंधित फौजदारी कारवाई मागे घेतली जाऊ शकते. यावर न्यायालयाने याचिकाकर्त्या कंपनीच्या भागीदारांवरील आणि अधिकाऱ्यांवरील फौजदारी खटला पुढे न चालू करण्याचे निर्देश बीआयएसला दिले.

तसेच, जप्त केलेले हेल्मेट याचिकाकर्त्याला परत करण्यास न्यायालयाने मुभा दिली. परंतु, हे हेल्मेट कायद्यानुसार परवानगी असलेल्या पद्धतीने नष्ट किंवा विल्हेवाट लावले जावेत आणि कोणत्याही परिस्थितीत ते बाजारात विकले जाणार नाहीत, अशी सक्त अट न्यायालयाने घातली आहे. या अटीच्या अधीन राहून उच्च न्यायालयाने ही रिट याचिका अंशतः मंजूर केली.

# केवळ ०.१ मिग्रॅ अधिक मद्य; केवळ फौजदारी खटला कसा?

## वाहन चालकाला मुंबई उच्च न्यायालयाचा दिलासा; तांत्रिक त्रुटींकडे लक्ष वेधत खटला रद्द

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

मद्यपान करून वाहन चालवल्याच्या आरोपाखाली दाखल करण्यात आलेल्या एका फौजदारी खटल्यात मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निकाल दिला आहे. जर रक्तातील मद्यप्रमाण हे विहित मर्यादेपेक्षा (३० मिग्रॅ/१०० मिली) केवळ नाममात्र म्हणजेच ०.१ मिग्रॅने जास्त असेल, तर केवळ त्या आधारावर चालकावर फौजदारी खटला चालवणे योग्य नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ नुसार, वाहन चालवणाऱ्या व्यक्तीच्या रक्तातील मद्यप्रमाण ३० मिग्रॅ प्रति १०० मिली पेक्षा जास्त असल्यास तो गुन्हा ठरतो. मात्र, या प्रकरणात याचिकाकर्त्याच्या चाचणीत मद्यप्रमाण हे विहित मर्यादेपेक्षा अत्यंत नगण्य फरकाने, म्हणजे केवळ ०.१ मिग्रॅने जास्त आढळून आले होते.

न्यायालयाने या प्रकरणावर सुनावणी करताना नमूद केले की, तांत्रिकदृष्ट्या मद्यप्रमाण मर्यादेपेक्षा जास्त असले तरी, अशा नगण्य फरकामुळे चालकावर फौजदारी खटला चालवणे हे कायद्याच्या मूळ उद्देशाला धरून नाही. कायद्यातील तरतुदींचा अर्थ लावताना केवळ तांत्रिक आकड्यांवर अवलंबून न राहता व्यावहारिक दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे, असे न्यायालयाने सुचवले आहे.



भारतीय मोटार वाहन कायद्यानुसार, ३० मिग्रॅ प्रति १०० मिली रक्तातील अल्कोहोल ही एक मानक मर्यादा निश्चित करण्यात आली आहे, ज्याचा उद्देश दुचाकीस्वाराची वाहन चालवण्याची क्षमता आणि सुरक्षा सुनिश्चित करणे हा आहे. मात्र, न्यायालयाच्या या ताज्या निर्णयामुळे अशा प्रकरणांमध्ये जिथे मद्य प्रमाण अत्यल्प फरकाने ओलांडलेले असते, तिथे दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या निर्णयामुळे वाहन चालवणाऱ्या नागरिकांवरील फौजदारी खटल्यांच्या तांत्रिक बाबींवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. उच्च न्यायालयाने अशा प्रकारे अत्यंत नगण्य फरकाच्या प्रकरणांमध्ये फौजदारी कारवाई रद्द करून एक प्रकारे न्यायप्रक्रियेतील 'विवेकबुद्धीचा' वापर केल्याचे मानले जात आहे.



# न्यायाला विलंब होणे म्हणजे न्याय नाकारणे!



ॲड.पल्लवी काळे
मार्गदर्शक, डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज

## डिजिटल न्यायालयांची तातडीची गरज आणि भविष्यातील आव्हाने व उपाय

गेल्या अनेक दशकांपासून, बार आणि बेंच (वकील आणि न्यायाधीश) कागदपत्रांच्या प्रचंड ओझ्याखाली काम करत आहेत. शिवाजीनगर जिल्हा न्यायालय किंवा आपल्या विविध न्यायाधिकरणांच्या (ट्रिब्युनल्स) कॉरिडॉरमधून जाताना, कायद्याचे वैभव दिसण्याऐवजी धुळीने माखलेल्या जुन्या कागदपत्रांचे ढीगच प्रकर्षाने डोळ्यांसमोर येतात. भौतिक दस्तऐवजांच्या या स्मशानभूमीतून अखंड डिजिटल प्रणालीकडे वाटचाल करणे ही आता केवळ एक चैनीची गोष्ट किंवा भविष्यातील प्रयोग राहिलेला नाहीतर आपल्या लोकशाहीच्या सुरळीत कामकाजासाठी आणि आपल्या स्थानिक कायदेशीर व्यवस्थेच्या अस्तित्वासाठी ती एक अनिवार्य अट आहे. पुण्याच्या जुन्या न्यायालयीन नोंदींच्या अथांग महासागराला डिजिटल आणि शोधण्यायोग्य स्वरूपात बदलणे, हाच आपल्या पक्षकारांना, वकिलांना आणि न्यायाधीशांना पिढ्यानपिढ्या भेडसावणाऱ्या पद्धतशीर अडचणींवर मात करण्याचा एकमेव मार्ग आहे.




या महाकाय कार्यात केवळ न्यायालयीन प्रशासनावर अवलंबून न राहता, वकिली क्षेत्र आणि पॅरा-लीगल (विधी-सहाय्यक) सेवांनी या सुवर्णसंधीचा पुरेपूर फायदा उठवणे गरजेचे आहे. प्रत्येक वकील आणि पॅरा-लीगल फर्मने त्यांच्या कार्यालयातील जुन्या व चालू खटल्यांच्या सर्व कागदपत्रांचे स्कॅनिंग आणि डिजिटायझेशन मोहीम म्हणून हाती घेतले पाहिजे. यामुळे केवळ न्यायालयेच नव्हे, तर संपूर्ण भारताला `कागदमुक्त` बनवण्याच्या राष्ट्रीय संकल्पनेला मोठी गती मिळेल.

आपल्या न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवणाऱ्या नागरिकांसाठी पारंपारिक न्यायालयातील खटला म्हणजे अनेकदा प्रचंड चिंता आणि गोंधळाचा अनुभव असतो. डिजिटायझेशन खऱ्या अर्थाने रिअल-टाइम (तात्काळ) उपलब्धता निर्माण करून या अनुभवात आमूलाग्र बदल घडवून आणते. केसची स्थिती तपासण्यासाठी न्यायालयाचा फेरा मारण्याऐवजी किंवा प्रत्यक्ष कॉपी डिपार्टमेंटमध्ये तासन्तास वाट पाहण्याऐवजी, पक्षकार यांना ऑनलाईन पोर्टलवरून केस स्टेटस आणि त्यासंबंधीचे अपडेट्स पाहू शकतात. ई-फायलिंग आणि व्हर्च्युअल सुनावणीमुळे डिजिटायझेशन खटल्याचा अतिरिक्त खर्चजसे की मोठ्या प्रमाणावर लागणारे प्रिंटिंग शुल्क, कुरिअर आणि वारंवार होणारा प्रवास खर्च पूर्णपणे कमी करते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, हरवलेल्या, गहाळ झालेल्या किंवा शोधण्यास वेळ लागणाऱ्या भौतिक फायलींमुळे प्रलंबित राहणाऱ्या खटल्यांचा त्रास यामुळे मोठ्या प्रमाणात कमी होतो.



हा बदल एकाच वेळी जागेच्या गंभीर समस्येवरही तोडगा काढतो. आपल्या न्यायालयीन परिसरातील जागेची किंमत प्रचंड आहे, तरीही हजारो स्क्वेअर फूट जागा सध्या केवळ दशके जुन्या फायली साठवण्यासाठी वापरली जात आहे. या नोंदींचे डिजिटायझेशन केल्याने कागदपत्रांचे संपूर्ण गोडाऊन सुरक्षित, क्लाउड-आधारित डेटा सेंटर्समध्ये सामावून जाईल, ज्यामुळे आपल्या संस्थांना प्रत्यक्ष सार्वजनिक पायाभूत सुविधा, चांगल्या बार रूम आणि पक्षकारांसाठी आवश्यक सुविधांसाठी मौल्यवान जागा परत मिळवता येईल. शिवाय, भौतिक रेकॉर्ड्स सांभाळण्यात मोठी जोखीम असते; ओलावा, वाळवी, आग आणि नैसर्गिक आपत्तींमुळे ते नष्ट होण्याचा धोका असतो. डिजिटल अर्काईव्ह (संग्रह) कायमस्वरूपी बॅकअपची खात्री देतो, ज्यामुळे पुण्याच्या कायदेशीर इतिहासाची संस्थात्मक स्मृती भौतिक ऱ्हासापासून सुरक्षित राहते.




हे डिजिटल पाऊल यशस्वी करण्यासाठी बार आणि बेंच या दोघांनीही एकत्र येऊन पेपरलेस वातावरणाशी जुळवून घेणे आवश्यक आहे.

या सांस्कृतिक बदलासाठी सामूहिक वचनबद्धतेची गरज आहे. बारमधील आपल्यासारख्या वकिलांसाठी, आधुनिक कायदेशीर सरावामध्ये गती आणि अचूकता आवश्यक आहे. जे वकील डिजिटल साधनांवर प्रभुत्व मिळवतील, ते जुने जाडजूड रिपोर्टर्स मॅन्युअली चाळण्याऐवजी अवघ्या काही सेकंदात लाखो ऐतिहासिक निकालांमधून अचूक संशोधन करू शकतात. ई-फायलिंग प्रणालीमुळे पुण्यातील तरुण आणि स्वतंत्र वकिलांना मोठ्या भौतिक कार्यालयांची किंवा फायलींच्या कपाटांची गरज नसतानाही समान पातळीवर स्पर्धा करण्याची संधी मिळते. बेंचचा विचार केला तर, आपले न्यायाधीश दररोज खटल्यांच्या प्रचंड याद्यांखाली दबलेले असतात. डिजिटल रेकॉर्ड्समुळे न्यायाधीशांना पूर्वीच्या युक्तिवादांचे संदर्भ त्वरित तपासता येतात, सुरक्षित लिंक्सद्वारे कनिष्ठ न्यायालयांचे रेकॉर्ड्स पडताळता येतात आणि खटल्यांच्या आकडेवारीचा पद्धतशीर मागोवा घेता येतो. यामुळे कागदपत्रांचा गोंधळ दूर होऊन न्यायाधीशांना पूर्णपणे कायद्याच्या मूळ गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करता येते. आपण हे समजून घेतले पाहिजे की खरे डिजिटल रूपांतर म्हणजे केवळ कागदी दस्तऐवज स्कॅन करून त्याचे पीडीएफमध्ये रूपांतर करणे नव्हे; तर एक सक्रिय, परस्परांशी जोडलेली प्रणाली तयार करणे आहे जिथे स्वयंचलित शोध साधने, सुरक्षित डिजिटल स्वाक्षऱ्या आणि खटल्यांचा मागोवा घेणारी प्रणाली अखंडपणे काम करेल.

शेवटी, जुन्या नोंदींचे डिजिटायझेशन करण्याचे खरे महत्त्व हे उद्याच्या कायदेशीर व्यवस्थेला सक्षम बनवण्यात आहे. जेव्हा ऐतिहासिक नोंदींचे मशीन-रीडेबल डेटामध्ये रूपांतर होते, तेव्हा न्यायव्यवस्थेच्या दीर्घकालीन विकासाच्या मोठ्या संधी खुल्या होतात. ऐतिहासिक डेटाचे विश्लेषणात्मक निरीक्षण प्रशासनाला न्यायव्यवस्थेतील नेमके अडथळे कुठे आहेत हे शोधण्यास मदत करते, ज्यामुळे डेटा-आधारित धोरणात्मक बदल करणे शक्य होते. याव्यतिरिक्त, भविष्यातील कायदेशीर संशोधन साधने पूर्णपणे ऐतिहासिक डेटाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतील, ज्याद्वारे वकील अचूक अंदाज वर्तवू शकतील आणि दशकांच्या केस लॉमधील विसंगती किंवा परस्परविरोधी पूर्वपक्ष त्वरित शोधू शकतील. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, यामुळे पूर्वपुराव्यांचे (प्रीसीडेंट्स) लोकशाहीकरण होईल, ज्यामुळे ऐतिहासिक निर्णय विद्यार्थी, सरकारी वकील आणि सामान्य नागरिकांसाठी त्वरित शोधण्यायोग्य आणि विनामूल्य उपलब्ध होतील. पुण्याच्या न्यायव्यवस्थेचे डिजिटायझेशन हे केवळ तांत्रिक अपग्रेड नाही, तर हे भूतकाळातील संरचनात्मक अडथळे दूर करून न्यायदान अधिक गतिमान, सुरक्षित आणि खऱ्या अर्थाने सर्वांसाठी खुले करणारे एक आवश्यक क्रांतिकारक पाऊल आहे.



# वकिली ते वाङ्मय: एका प्रवासाची गाथा

## 'द कोर्ट-कोट नेव्हर लिमिटेड माय ड्रीम्स' असे म्हणत साहित्यासाठी जीवन वाहून घेणारे ज्येष्ठ विधिज्ञ रंगत-संगत प्रतिष्ठानचे संस्थापक ॲड. प्रमोद आडकर यांची गाथा!

*दशकन् दशकं वकिलीच्या क्षेत्रात मोठं यश मिळवल्यानंतर जेव्हा न्यायालयाचं कामकाज संपायचं, तेव्हा एका नव्या प्रवासाची सुरुवात होत असे. हा असा प्रवास होता ज्यात घराची गच्ची एका साहित्यिक मंचात रुपांतरित झाली. अनोळखी लोकांना आपलं कुटुंब बनवलं आणि कवितेला समाज बदलायचं एक साधन केलं.*

*बहुतांश वकील आपल्या यशाची मोजदाद निकालांच्या कागदपत्रांवर किंवा न्यायालयात घालवलेल्या वर्षांवर करतात; पण ॲड. आडकर यांचे निकष पूर्णपणे वेगळे आहेत. जेव्हा त्यांना त्यांच्या कारकिर्दीबद्दल विचारलं जातं, तेव्हा ते वकिली सोबतच कविता, पुस्तकं, सामाजिक जाणिवा, झाडं, नेत्रदान आणि हजारो लोकांशी जुळलेल्या माणसांच्या नात्यांबद्दल भरभरून बोलतात.*



*अल्प परिचय: ॲड. प्रमोद ज्ञानेश्वर आडकर यांनी बी.कॉम., एलएल.बी. आणि प्रिंटिंग टेक्नॉलॉजीमध्ये डिप्लोमापर्यंतचे शिक्षण घेतले आहे. वकिली हा त्यांचा मुख्य आणि पारंपरिक व्यवसाय असला, तरी समाजप्रबोधन व साहित्याची आवड जोपासत त्यांनी ७ जून १९९२ रोजी 'रंगत-संगत प्रतिष्ठान' आणि ६ डिसेंबर १९९९ रोजी 'आडकर फाऊंडेशन'ची स्थापना केली. या दोन्ही संस्थांच्या माध्यमातून त्यांनी आजपर्यंत १५६० हून अधिक साहित्य व समाजप्रबोधनाचे कार्यक्रम पूर्णपणे विनामूल्य आयोजित केले आहेत. ते महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह म्हणूनही अत्यंत यशस्वीपणे कार्यरत आहेत.*

**वकिली आणि साहित्याचा सुंदर संगम**

वकिली हा त्यांचा वडिलोपार्जित व्यवसाय होता. त्यांचे आजोबा आणि वडील दोघेही वकील असल्यामुळे नकळतच ते या क्षेत्रात आले. मात्र, त्यांच्या घरात साहित्याचाही मोठा वारसा होता. त्यांची आई कवयित्री होती आणि वडिलांना पटकन कविता करण्याची उत्तम उपजत आवड होती. त्यामुळे एकाच घरात कायदा आणि साहित्य एकाच टेबलवर बसल्याचं पाहून ते लहानाचे मोठे झाले. परिणामी, त्यांनी या दोन्ही जगांना कधीही वेगळं मानलं नाही.

**या प्रवासाबद्दल सांगताना ते म्हणतात:**

"कायद्याने माणसाला आवाज दिला, मग साहित्यालाही तो मिळायला नको का? हाच तो एक प्रश्न होता ज्याने माझे आयुष्य पूर्णपणे बदलून टाकले."

अनेक प्रतिभावान कवींना एक हक्काचं व्यासपीठ मिळावं, या प्रामाणिक उद्देशाने त्यांनी ७ जून १९९२ रोजी स्वतःच्या शनवार पेठेतील घराच्या गच्चीवर 'रंगत-संगत प्रतिष्ठान'ची पहिली पायरी रचली. पावसाच्या पहिल्या दिवशी सुरू झालेला हा सुंदर प्रवास पुढे कधीही थांबला नाही.

**कधीही स्वीकारले नाही व्यावसायिकरण**

रंगत-संगत प्रतिष्ठान किंवा आडकर फाऊंडेशन कधीही व्यावसायिक होऊ दिलं नाही, हा त्यांच्या कार्याचा अत्यंत महत्त्वाचा आणि कौतुकास्पद पैलू आहे. कोणतीही वर्गणी किंवा मोठे प्रायोजक नसताना, केवळ लोकांच्या मनातील अफाट विश्वासाच्या जोरावर त्यांनी १५०० हून अधिक कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे आणि पूर्णपणे विनामूल्य पार पाडले. याविषयी बोलताना ते सांगतात:

"ज्या दिवशी साहित्य हा एक निव्वळ व्यापार बनतो, तेव्हा त्याचा खरा आत्मा मरतो. मला लोकांचे फक्त मनोरंजन करायचे नव्हते, तर प्रत्येक कार्यक्रमाने माणसाला थोडा अधिक संवेदनशील बनवले पाहिजे, हाच आमचा मुख्य उद्देश होता."

दिवसभरात कौटुंबिक आणि फौजदारी खटले लढवणे, क्लायंट्सना भेटणे आणि न्यायालयाची सर्व कामे पार पाडल्यानंतर ते संध्याकाळचा वेळ पूर्णपणे साहित्यासाठी राखिव ठेवत असत. ज्या कामात मनापासून आनंद असतो, तिथे माणसाला कधीच तासांची मोजावी लागणारी गणना करावी लागत नाही, असं त्यांचं स्पष्ट मत आहे.

**गुरु आणि पत्नीची मोलाची साथ**

आपल्या आजवरच्या या खडतर प्रवासात आपले गुरू आणि कुटुंबाने दिलेल्या खंबीर साथीचा ते आवर्जून उल्लेख करतात. आपले गुरू आणि ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ ॲड. भास्करराव आव्हाड यांच्या 'वैदिक ज्युरीप्रूडन्स' या ग्रंथाचा मराठी अनुवाद करताना त्यांना कायद्याचं एक अगदी नवीन आणि खोलवरचं परिप्रेक्ष्य मिळालं. याशिवाय, त्यांची पत्नी मैथिली यांनी प्रत्येक सुख-दुःखात आणि कठीण प्रसंगात दिलेली साथ व पाठबळ यामुळेच आपण हे मोठं साहित्यिक विश्व उभं करू शकल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

जेव्हा त्यांना विचारले गेले की पहिल्या कार्यक्रमाच्या वेळी ते नर्व्हस होते का, तेव्हा त्यांनी त्या आठवणींना उजाळा दिला,




लोकांच्या मनात अशी कल्पना असते की, जो स्टेजवर उभा राहतो तो आत्मविश्वासूच असतो. पण खरं सांगू? मी फक्त तेव्हा तिथे गर्दी असेल का, याची काळजी करत होतो. पहिल्या पावसाचा तो दिवस होता आणि मनात प्रश्न होता, 'जर पाऊस पडला तर? जर कोणीच आले नाही तर?' पण जेव्हा मी त्या गर्दीने भरलेली गच्ची पाहिली, तेव्हा मला खात्री पटली की हे निसर्गाचे या स्वप्नावर असलेले आशीर्वाद आहेत."

आयुष्यातील मार्गदर्शक आणि गुरू, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. भास्करराव आव्हाड यांच्याबद्दल बोलताना ते म्हणतात "प्रत्येक वकीलाला तो सीनियर आठवतो ज्याने त्याला कायद्याची प्रक्रिया शिकवली. मला तो सीनियर आठवतो ज्याने मला दृष्टी दिली. आज एक वकील म्हणून माझ्याकडे जी काही खोली आहे, ती बरयाच अंशी त्यांना पाहून विकसित झाली आहे. काही कर्जं आयुष्यात अशी असतात जी कधीच फेडता येत नाहीत, आणि माझ्या गुरूंचे माझ्यावरचे उपकार हे त्यातलेच एक आहेत. कृतज्ञ राहणे इतकेच माझ्या हातात आहे."

आपल्या संपूर्ण जीवनप्रवासाचा गोषवारा सांगताना ॲड. आडकर अतिशय मार्मिकपणे म्हणतात : "मी माझ्या आयुष्याची मोजदाद कधीही पुरस्कारांवर किंवा मिळालेल्या टाळ्यांवर केली नाही, तर छोट्या-छोट्या क्षणांवर केली. मी कधीच असा विचार करत नाही की मी काय मिळवले? मी फक्त स्वतःला एवढेच विचारतो की, मी हा समाज जसा शोधला होता, त्यापेक्षा त्याला थोडा अधिक सुंदर आणि सुधारलेला बनवून ठेवू शकलो का?"

आयुष्याची सहा दशके यशस्वीपणे ओलांडल्यानंतरही त्यांच्या मनात कसलाही अहंकार नाही, तर केवळ परमेश्वराविषयी कृतज्ञता आणि मनाची अगाध तृप्तता आहे.

■■■






# एक वसाहतकालीन कर आणि महाराष्ट्राची दिशा बदलणारी ऐतिहासिक जनहित याचिका

*भारतीय न्यायव्यवस्था आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत **ॲड. सत्या मुळे** हे एक अत्यंत परिचित आणि प्रभावी नाव आहे. मुंबई उच्च न्यायालय आणि भारताचे सर्वोच्च न्यायालय येथे नियमित वकिली करणारे अडव्होकेट सत्या मुळे हे केवळ कायदेशीर क्षेत्रापुरते मर्यादित नसून, एक लेखक, खंदे समाजसुधारक आणि कायदेशीर क्षेत्रातील मोठे 'चेंज मेकर' म्हणून ओळखले जातात. आधुनिक महाराष्ट्रात आजही अस्तित्वात असलेल्या ब्रिटिशकालीन 'अकृषक कराच्या' (एन ए टॅक्स ) विरोधात विधिमंडळ आणि न्यायव्यवस्थेच्या पटलावर **ॲड. मुळे** यांनी एक यशस्वी लढा लढला. हा लढा केवळ कायदेशीर कलम वाचण्याचा नसून, शहरी नागरिकांवरील दुहेरी करभार आणि समानतेच्या अधिकाराचा (कलम १४) प्रश्न होता. प्रस्तुत मुलाखतीत, प्रतिनिधी **ॲड. रुची मेमाणे यांनी ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. मुळे यांच्याशी** या महत्त्वपूर्ण प्रकरणावर सविस्तर संवाद साधला.*



**प्रश्न : कागदावर पाहता हा प्रश्न अतिशय तांत्रिक आणि महसुली कायद्याचा वाटतो, परंतु आपण नेहमीच याचे वर्णन एका व्यापक सामाजिक आणि राज्यव्यापी परिणामांचा विषय म्हणून केले आहे. नेमका हा मुद्दा काय होता?**



**ॲड. सत्या मुळे**

**उत्तर :** मूळ मुद्दा महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील 'अकृषक कराचा' (एन ए टॅक्स) होता. जेव्हा कोणतीही जमीन शेतीसाठी वापरणे थांबवून ती निवासी, व्यावसायिक किंवा इतर अकृषक कामासाठी वापरली जात असे मग ते घर असो, बंगला असो किंवा वखारतेव्हा जमीनमालकाला एकरकमी रूपांतरण शुल्क भरून पुढे दरवर्षी नियमितपणे एन.ए. कर द्यावा लागायचा.

बहुतेक लोकांनी ही एक सामान्य कायदेशीर प्रक्रिया म्हणून ती स्वीकारली होती. परंतु, जेव्हा मी या तरतुदीचा अभ्यास केला, तेव्हा मला समजले की याची मुळे पूर्णपणे ब्रिटिश काळातील आहेत. ब्रिटिशांच्या काळात देशात वारंवार दुष्काळ आणि अन्नाचा तुटवडा पडल्याने शेतीला संरक्षित मानले गेले होते. शेती सोडून इतर कामांकडे वळण्यापासून रोखण्यासाठी हा दंडसदृश कर तयार करण्यात आला होता. माझा साधा प्रश्न होता ब्रिटिशांच्या काळातील शेती धोरणासाठी तयार केलेला हा कर, आजच्या आधुनिक शहरी महाराष्ट्रात त्याच पद्धतीने कसा सुरू राहू शकतो?

**प्रश्नः याच बिंदूवर आपण घटनात्मक मुद्दा उपस्थित केला का?**

**उत्तर :** : अगदी बरोबर. कायदा वाचताना मला एक महत्त्वाची गोष्ट आढळली. कायद्यानेच 'गावठाण' क्षेत्रांना जिथे पारंपरिक ग्रामीण वस्ती होती एन.ए. करातून सूट दिली होती. त्यामुळे एक मोठा घटनात्मक प्रश्न निर्माण झाला. जर सूट देण्यामागचे तत्त्व हे असेल की रहिवासी वस्त्यांवर कराचा बोजा नको, तर ही सूट केवळ जुन्या गावठाण सीमांपुरतीच का मर्यादित असावी?

पुण्याचेच उदाहरण घ्या. शिवजीनगर गावठाणात एन.ए. कर नाही. बाणेर गावठाणात कर नाही. बालेवाडी गावठाणात कर नाही. पण रस्त्याच्या पलीकडे असलेल्या एका निवासी इमारतीला मात्र हा कर भरावा लागतो. केवळ एखादी जुनी वास्तू गावठाणात येते म्हणून दोन समान निवासी इमारतींवर वेगवेगळा न्याय का? माझ्या मते, हा भारतीय संविधानाच्या कलम १४ मधील समानतेच्या अधिकाराचा थेट भंग होता.

**प्रश्नः या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात नेमकी कशी झाली? ही एखाद्या व्यक्तीची तक्रार होती की मोठा सार्वजनिक प्रश्न?**

**उत्तर :** हा आधीच व्यापक सार्वजनिक प्रश्न बनला होता. महाराष्ट्र को ऑपरेटिभ हाऊसिंग सोसायटीज अँड अपार्टमेन्ट्स फेडरेशनने अनेक वकिलांशी संपर्क साधला होता, कारण नागरिक प्रत्यक्षात दोन वेगवेगळे कर भरत होते एकीकडे महापालिकेचा मालमत्ता कर आणि दुसरीकडे वार्षिक एन.ए. कर.

मराठीत सांगायचे तर, ही स्थिती "एक घर आणि दोन कर" अशी झाली होती. याचा आर्थिक भार प्रचंड होता. काही मोठ्या सोसायट्या आणि टाऊनशिप्सना दरवर्षी २५ लाख, ५० लाख आणि काही ठिकाणी जवळपास १ कोटी रुपयांपर्यंत एन.ए. कर भरण्यास सांगितले जात होते. समस्या एवढी मोठी असूनही त्यावर कोणताही कायदेशीर मार्ग निघाला नव्हता. शेवटी हे प्रकरण आमच्याकडे आले.

**प्रश्नः या प्रकरणात आपली रणनीती नेमकी काय होती? इतर वकिलांपेक्षा तुमचा दृष्टिकोन कसा वेगळा होता?**

**उत्तर :** मी हा कर केवळ स्वतंत्रपणे आव्हानात्मक ठरवण्याचे टाळले. त्याऐवजी मी या सवलतीच्या व्याख्येशी आणि त्याच्या अंमलबजावणीशी थेट मुकाबला केला. माझा युक्तिवाद होता की, जर 'गावठाणाचा' ऐतिहासिक अर्थ 'लोक राहतात ती जागा' असा असेल, तर ती व्याख्या काळासोबत बदलली पाहिजे.

> *महाराष्ट्र जमीन महसूल संहितेचे हे प्रकरण सिद्ध करते की महसुलाचे एक तांत्रिक कलम कसे मोठे घटनात्मक आणि धोरणात्मक युद्ध बनू शकते. ब्रिटिशकालीन कररचनेला आधुनिक महाराष्ट्रात दिलेले हे आव्हान आणि त्यानंतर मिळालेली स्थगिती दर्शवते की, जेव्हा निष्णात वकील सखोल संशोधनासह प्रामाणिक प्रयत्न करतात, तब न्यायव्यवस्था आणि शासन यंत्रणा दोघेही जनहितासाठी कसे सकारात्मक निर्णय घेऊ शकतात.*

शहरे विस्तारली आहेत. महानगरपालिकांनी विकास आराखडे (DP) तयार केले आहेत. नियोजन प्राधिकरणांनी आणि राज्य सरकारने स्वतः निवासी क्षेत्रे अधिकृतपणे घोषित केली आहेत.




एकदा सरकारने संपूर्ण भाग निवासी क्षेत्र म्हणून घोषित केला, तर तो भाग अकृषक करासाठी अद्याप शेतजमीन असल्यासारखा कसा मानला जाऊ शकतो? हे शहरी नियोजन कायदे आणि महसूल प्रशासन यांच्यातील विसंगती स्पष्ट करत होते.

**प्रश्नः हा खटला जुन्या निवाडयांवर आधारित होता का?**

**उत्तर :** : तेच तर सर्वात मोठे आव्हान होते. हे असे प्रकरण नव्हते जिथे तुम्ही एखादे लॉ जर्नल उघडून रेडीमेड उत्तर शोधू शकाल. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता वाचणे सोपे नाही. एक कलम दुसऱ्या कलमाचा संदर्भ देते आणि तिसऱ्याशी जोडले जाते. अशी तब्बल तीस कलमे एकत्र करताना कायदेशीर रचना अत्यंत गुंतागुंतीची होते.

आम्ही सलग एक महिना वारंवार कायदा वाचला, त्याच्या तरतुदी जुळवून पाहिल्या आणि त्यामागील तांत्रिक तर्कशास्त्र समजून घेतले. बऱ्याच अंशी हे




सामान्य खटल्यासारखे नसून एखाद्या गुंतागुंतीच्या जिगसॉ पझलसारखे वाटत होते.

**प्रश्नः जेव्हा हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात पोहोचले, तेव्हा नेमके काय घडले?**

**उत्तर :** सर्वात मनोरंजक भाग म्हणजे राज्य सरकार स्वतः यावर संभ्रमात होते. सुनावणीच्या पहिल्याच तारखेला मी स्पष्ट केले की, वार्षिक एन.ए. करामुळे सरकारला मिळणारा महसूल अगदी नगण्य फक्त एक किंवा दोन टक्के होता परंतु सामान्य नागरिकांवरील बोजा मात्र प्रचंड होता.

मी न्यायालयाला सांगितले की, जर सरकारला हा जुना भेदभाव योग्य वाटत असेल, तर त्यांच्याकडे दोनच घटनात्मक मार्ग आहेत: एकतर हा गावठाणाचा नियम सर्व शहरी निवासी क्षेत्रांना लागू करा, किंवा गावठाणातील सवलत पूर्णपणे काढून टाका. पण असमान वागणूक चालणार नाही. जनहित याचिका पाहिल्यानंतर राज्य सरकारलाही ही विसंगती समजली. न्यायालयाला आश्चर्य वाटेल अशा रीतीने सरकारने एन.ए. कर वसुलीला स्थगिती (Stay) देण्याचे जाहीर केले. उच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, सरकारने जेव्हा त्रुटी ओळखली आहे आणि सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे, तेव्हा आता न्यायालयाच्या हस्तक्षेपाची गरज नाही.

अखेर एक शासन निर्णय (GR) जारी करण्यात आला आणि महाराष्ट्रातील शहरी भागांना वार्षिक एन.ए. कराच्या वसुलीपासून मोठा दिलासा मिळाला. माझ्यासाठी हा खटल्याचा सर्वात समाधानाची बाजू होती. न्यायालयाचा निकाल जिंकणे हा आमचा उद्देश नव्हता, तर हजारो नागरिकांचा प्रश्न सोडवणे हा होता.

**प्रश्नः ही जनहित याचिका आपण पूर्णपणे 'प्रोट बोनो' (विनाशुल्क) लढवली. मोफत काम करण्यामागे नेमकी काय भूमिका होती?**

**उत्तर :** कारण काही प्रकरणे ही अशिलापेक्षा खूप मोठी असतात. जेव्हा एखादा कायदेशीर प्रश्न संपूर्ण वर्गाला प्रभावित करत असतो, तेव्हा वकिलाचीही काही सामाजिक जबाबदारी असते. कायदा आपल्याला स्ट्रक्चरल समस्या ओळखण्याची शक्ती देतो. जर आपण ती ताकद फक्त व्यावसायिक खटल्यांसाठी वापरली, तर आपले व्यावसायिक कर्तव्य अपूर्ण राहते. मी कधीही मानले नाही की न्याय मिळवणे ही केवळ पैसे असलेल्यांची मक्तेदारी असावी.

**प्रश्नः आज मागे वळून पाहताना, या प्रकरणामुळे वकिल म्हणून तुम्हाला काय शिकायला मिळाले?**

**उत्तर :** याने मला शिकवले की न्यायालये अशा वकिलांचा सन्मान करतात जे फक्त तक्रारी घेऊन नाही तर प्रत्यक्ष उपाय घेऊन न्यायालयात जातात. जनहित याचिकेने फक्त काय चुकीचे आहे हे दाखवू नये, तर संविधानाच्या चौकटीत राहून एक योग्य मार्ग दाखवला पाहिजे. अनेकदा सरकारलाही समस्या माहीत असते, पण ती सोडवण्यासाठी कायदेशीर चौकट काय असावी, हे त्यांना हवे असते. जर एखादा वकील योग्य संशोधनातून ती चौकट देऊ शकला, तर ते लिटिगेशन धोरणात्मक सुधारणा घडवून आणू शकते.

### 'डिजिटल नोटिस बोर्ड आणि केस कॉज लिस्ट डिस्प्ले'

प्रत्येक कोर्टरूमच्या बाहेर आणि मुख्य इमारतीच्या लॉबीमध्ये मोठ्या आकाराचे 'डिजिटल एलसीडी डिस्प्ले बोर्ड्स' लावले जावेत, ज्यावर त्या दिवशीच्या खटल्यांची अद्ययावत 'कॉज लिस्ट' व कोणता जज किती नंबर केसवर सुनावणी घेत आहे याची माहिती रिअल-टाइममध्ये दिसेल, ज्यामुळे वकिलांना आणि पक्षकारांना नाहक ताटकळत उभे राहावे लागणार नाही आणि कोर्टरूमबाहेर होणारी अनावश्यक गर्दी टळेल.

**ॲड. नीलिमा कुलकर्णी,** पुणे जिल्हा न्यायालय

### 'पावसापासून संरक्षणासाठी संपूर्ण कव्हर कॉरिडॉर मार्ग'

पुण्यातील पावसाळा लक्षात घेता न्यायालयाच्या एका इमारतीतून दुसऱ्या इमारतीत जाणाऱ्या सर्व रस्त्यांवर आणि पादचारी मार्गांवर मजबूत 'फायबर ग्लासची छत असलेली कव्हरेड कँनोपी' तयार करावी, ज्यामुळे पावसात किंवा कडक उन्हात ये-जा करताना पक्षकार, वकील आणि न्यायाधीशांना कोणत्याही प्रकारचा शारीरिक त्रास सहन करावा लागणार नाही आणि परिसर अधिक सुरक्षित व व्यवस्थित राहील.

**सामाजिक कार्यकर्ता विजय तावरे,** बिबवेवाडी, पुणे

### 'स्थानिक मराठी भाषेसाठी विशेष कायदेशीर शब्दकोश किओस्क'

न्यायालयातील क्लिष्ट इंग्रजी कायदेशीर शब्द आणि निकाल सर्वसामान्यांच्या मातृभाषेत सोप्या मराठीत समजण्यासाठी मुख्य इमारतीत एक 'मराठी कायदेशीर शब्दकोश डिजिटल किओस्क' असावा, ज्यावर नागरिक गुंतागुंतीच्या कायदेशीर अटींचा मराठी अर्थ शोधू शकतील, ज्यामुळे न्यायव्यवस्थेची सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्याची क्षमता कैक पटीने वाढेल आणि पारदर्शकता येईल.

**पक्षकार सुनील वाघ,** हडपसर, पुणे




### 'सायकल पार्कमध्ये ई-बाईक चार्जिंग स्टेशन'

पर्यावरणपूरक प्रवासाला प्रोत्साहन देण्यासाठी न्यायालयाच्या परिसरात येणाऱ्या वकील आणि पक्षकारांच्या सायकली व इलेक्ट्रिक दुचाकींसाठी एक सुरक्षित 'सायकल व ई-बाईक पार्किंग झोन' तयार करून तिथे मोफत चार्जिंग पॉइंट्स द्यावेत, ज्यामुळे हरित ऊर्जेचा वापर वाढेल, वाहनांची शिस्त बिघडणार नाही आणि न्यायालय परिसरातील वायू व ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणात कमी होण्यास हातभार लागेल.

**ॲड. प्रिया कुलकर्णी,** बाणेर, पुणे

### 'वृद्ध व असहाय पक्षकारांसाठी व्हीलचेअर व स्वयंसेवक मदत कक्ष'

न्यायालयाच्या प्रवेशद्वारावरच तरुण व उत्साही महाविद्यालयीन विद्यार्थी किंवा सामाजिक स्वयंसेवकांचा समावेश असलेला एक 'हेल्प डेस्क आणि व्हीलचेअर सेवा कक्ष' असावा, जो वृद्ध व अनाथ पक्षकारांना योग्य कोर्टरूम शोधण्यात व कागदपत्रे जमा करण्यात मदत करेल, ज्यामुळे माणुसकीचे दर्शन घडून हतबल झालेल्या नागरिकांना मानसिक आधार मिळेल आणि संपूर्ण व्यवस्थेवरचा त्यांचा विश्वास दृढ होईल.

**सामाजिक कार्यकर्ता वैशाली काळे,** कोथरूड, पुणे

### 'न्यायालयाच्या आवारात पिण्याच्या पाण्याची हायजीनिक वॉटर एटीएम प्रणाली'

न्यायालय परिसरात सर्वसामान्यांसाठी पिण्याच्या पाण्याचा तुटवडा भासू नये म्हणून ठिकठिकाणी 'आर.ओ. युनिटयुक्त डिजिटल वॉटर एटीएम' बसवले जावेत, जिथून अतिशय स्वस्त दरात किंवा मोफत शुद्ध थंड पाणी मिळेल, ज्यामुळे प्लास्टिकच्या बाटल्यांचा वापर थांबून परिसर प्लास्टिकमुक्त होईल आणि पक्षकारांना उन्हाळ्यात हायड्रेटेड राहण्यास मोठी मदत होईल.

**पक्षकार बबनराव सोनावणे,** जुन्नर, पुणे

### 'कायदेशीर ग्रंथालयासाठी डिजिटल रिसर्च असिस्टंट टूल'

पुणे बार असोसिएशनच्या ग्रंथालयात वकिलांना केस लॉ आणि जुने जजमेंट शोधण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) वर आधारित 'कायदेशीर रिसर्च असिस्टंट टूल' उपलब्ध करून द्यावे, ज्याच्या मदतीने वकील विशिष्ट विषयावरील सर्वोच्च न्यायालयाचे सर्व जुने संदर्भ काही सेकंदात शोधू शकतील, ज्यामुळे त्यांच्या कायदेशीर युक्तिवादाचा दर्जा जागतिक स्तरावर उंचावेल.

**ॲड. वैशाली मोरे,** कोथरूड, पुणे

### 'सीसीटीव्ही आणि मानवी सुरक्षेसाठी एकात्मिक कमांड सेंटर'

न्यायालयीन संकुलातील प्रत्येक कोपरा, कॉरिडॉर आणि प्रवेशद्वार सुरक्षित ठेवण्यासाठी मुख्य इमारतीत एक 'सेंट्रलाइज्ड सीसीटीव्ही कमांड अँड सेक्युरिटी कंट्रोल सेंटर' स्थापित केले जावे, ज्यावर चोवीस तास सुरक्षा रक्षकांचे लक्ष असेल, ज्यामुळे कोणत्याही अनुचित प्रकाराला किंवा गैरप्रकाराला तात्काळ आळा घालता येईल आणि संपूर्ण परिसर अत्यंत सुरक्षित व भयमुक्त राहील.

**पोलीस कर्मचारी,** शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे

### 'महिला आणि पक्षकारांसाठी तक्रार व मानसोपचार समुपदेशन केंद्र'

सततच्या न्यायालयीन खटल्यांमुळे तीव्र मानसिक तणाव व नैराश्यात गेलेल्या पक्षकारांसाठी आणि महिलांसाठी एक 'मानसोपचार व कायदेशीर समुपदेशन कक्ष' सुरू करावा, जिथे तज्ज्ञ डॉक्टर व काउन्सेलर त्यांना मानसिक आधार देतील, ज्यामुळे आत्महत्येचे किंवा टोकाच्या मानसिक विचलनाचे विचार टाळून नागरिकांना एक सकारात्मक ऊर्जा आणि दिलासा देणारा भावनिक आधार मिळू शकेल.

**ॲड. प्रियांका शितोळे,** कोथरूड, पुणे



वाचकांनी आपली पत्रे developednationslaw@gmail.com वर पाठवावीत किंवा, संपादक, डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज, ऑफिस नं. ७, पहिला मजला, चुनावाला चेंबर्स, शिक्षण मंडळाशेजारी, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ५ या पत्त्यावर पाठवावीत.



# सायबर फ्रॉड : बँकांची मनमानी आता बंद!

## मुंबई उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय, डिजिटल युगात बँकांना जबाबदारी टाळता येणार नाही, ग्राहकांना मोठा दिलासा

*आजच्या डिजिटल आणि ऑनलाइन बँकिंगच्या युगात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. बँक खात्यातून पैसे चोरीला गेल्यास सर्वसामान्यांना मानसिक आणि आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागते. अशाच एका गंभीर आणि बहुचर्चित प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने ६ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या एका ऐतिहासिक निर्णयाने बँक ग्राहकांसाठी आशेचा नवीन किरण दाखवला आहे. 'सुबोध सी. कोर्डे विरुद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर' या खटल्यातील हा निकाल डिजिटल बँकिंगच्या सुरक्षिततेच्या आणि कायदेशीर उत्तरदायित्वाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे.*




स्वातंत्र्य दिन विशेष

पुण्यातील रहिवासी असलेल्या सुबोध सी. कोर्डे यांच्या एचडीएफसी बँकेच्या खात्यातून अवघ्या ४१ मिनिटांच्या आत तब्बल ३८ लाख ४ हजार रुपयांची अनाधिकृत रक्कम काढण्यात आली. एकापाठोपाठ एक अशा आठ ऑनलाइन व्यवहारांद्वारे ही मोठी रक्कम गायब झाली. विशेष म्हणजे, तक्रारदाराच्या नकळत व संमतीशिवाय त्यांच्या खात्यात नवीन लाभार्थी जोडण्यात आले आणि ऑनलाइन व्यवहाराची मर्यादा ४ लाखांवरून थेट ४० लाखांपर्यंत वाढवण्यात आली. या संपूर्ण प्रक्रियेत कोणतेही 'वन टाईम पासवर्ड' (OTP) प्राप्त झाले नसल्याचा दावा त्यांनी केला होता. या प्रकरणी वाकड पोलिसांनी सखोल तपासणी केल्यानंतर, तक्रारदाराची कोणतीही कुचराई किंवा निष्काळजीपणा नसल्याचे स्पष्ट केले. तसेच, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (RBI) नियमांनुसार फसवणूक झालेली सर्व रक्कम ग्राहकाला तात्काळ परत करण्यात अशी स्पष्ट विनंती पोलिसांनी बँकेला केली होती.



**ॲड. नीरज जगताप**
**सायबर कायदेतज्ज्ञ**

### न्यायालयापुढील महत्त्वाचे मुद्दे आणि कायदेशीर युक्तिवाद

या खटल्याच्या सुनावणीदरम्यान आरबीआयच्या ६ जुलै २०१७ रोजीच्या 'कस्टमर प्रोटेक्शन – लिमिटिंग लायबिलिटी ऑफ कस्टमर्स इन अनाधिकृत इलेक्ट्रॉनिक ट्रान्झॅक्शन्स' या परिपत्रकावर मुख्य भर देण्यात आला. न्यायालयासमोर दोन्ही बाजूंकडून खालीलप्रमाणे मुद्दे मांडण्यात आले:

**शून्य ग्राहक जबाबदारी:** जर सायबर फसवणूक ही बँकेच्या निष्काळजीपणामुळे किंवा त्यांच्या सुरक्षा प्रणालीतील त्रुटींमुळे झाली असेल, तर ग्राहकाची कोणतीही आर्थिक जबाबदारी राहत नाही, असा नियम या प्रकरणात लागू होतो.

**पुराव्याचा भार:** ग्राहकाने दुर्लक्ष केल्याचे किंवा त्याची कोणतीही चूक असल्याचे सिद्ध करण्याची संपूर्ण कायदेशीर जबाबदारी बँकेवर असते, ग्राहकावर नाही.

**बँकेचा युक्तिवाद:** एचडीएफसी बँकेने हा कराराविषयक वाद असल्याने रिट याचिका दाखल करण्यायोग्य नसल्याचा प्राथमिक मुद्दा उपस्थित केला. तसेच, ओटीपी यशस्वीपणे पाठवले गेले होते आणि संबंधित व्यवहार ग्राहकाच्या नोंदणीकृत डिव्हाइसवरूनच झाले होते, असे बँकेचे म्हणणे होते.

### अंतर्गत यंत्रणेचे अपयश आणि न्यायालयाचे गंभीर निरीक्षण

या संपूर्ण खटल्यातील सर्वात धक्कादायक आणि महत्त्वाची बाब म्हणजे, बँकेच्या स्वतःच्या अंतर्गत फसवणूक सनियंत्रण प्रणालीने (Internal Fraud Monitoring System) संशयित व्यवहार आधीच ओळखले होते. नवीन लाभार्थी जोडताना प्रणालीने धोक्याची घंटा वाजवली होती आणि ते लाभार्थी जोडण्यास स्पष्ट मनाई करण्याची शिफारस केली होती. मात्र, बँकेच्या यंत्रणेने या अंतर्गत इशारांकडे दुर्लक्ष करून लाभार्थींना मंजुरी दिली आणि त्यानंतर उच्च-मूल्याचे व्यवहार सुरळीत पार पाडले गेले.

न्यायालयात सादर केलेल्या कागदपत्रांनुसार, जर बँकेने लाभार्थी जोडतानाच तात्काळ हस्तक्षेप केला असता, तर हा मोठा आर्थिक घोटाळा पूर्णपणे टाळता आला असता किंवा त्याचे नुकसान मोठ्या प्रमाणावर कमी करता आले असते. हा निकाल हा अत्यंत महत्त्वाचा संदेश देतो की, केवळ 'ओटीपी' पाठवून बँका आता आपली सर्व जबाबदारी झटकू शकत नाहीत. संशयित हालचाली किंवा विसंगती आढळल्यास ग्राहकांशी तातडीने संपर्क साधणे आणि कडक प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे प्रत्येक वित्तीय संस्थेसाठी बंधनकारक आहे. हा निकाल भविष्यातील अशा अनेक प्रकरणांसाठी एक मजबूत पायंडा पाडणारा ठरणार आहे.

> ### सर्वसामान्यांसाठी काय?
> मुंबई उच्च न्यायालयाच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे बँकांच्या बेजबाबदार आणि ढिसाळ कारभाराला मोठा कायदेशीर आळा बसणार आहे. आरबीआयच्या नियमांनुसार, जर सायबर फसवणुकीत ग्राहकाची कोणतीही प्रत्यक्ष चूक किंवा निष्काळजीपणा नसेल आणि बँक किंवा त्यांच्या डिजिटल सुरक्षेतील त्रुटींमुळे पैसे गेले असतील, तर ग्राहकाला कोणताही भुर्दंड सहन करावा लागणार नाही. बँकांना ठराविक मुदतीत संपूर्ण रक्कम परत करावी लागेल. सर्वसामान्यांसाठी हा निकाल अत्यंत फायदेशीर आणि दिलासादायक ठरला आहे, कारण यामुळे 'डिजिटल फसवणुकीची सर्व जबाबदारी आणि ताण नेहमी ग्राहकाचाच असतो' हा बँकांचा जुना समज पूर्णपणे खोटा ठरला आहे. आता बँकांना त्यांच्या अंतर्गत सुरक्षा यंत्रणा अधिक भक्कम कराव्या लागतील आणि ग्राहकांच्या पैशांच्या सुरक्षेची अधिक नैतिक व कायदेशीर जबाबदारी स्वीकारावी लागेल. हा निकाल प्रत्येक ऑनलाइन बँकिंग वापरणाऱ्या सामान्य नागरिकाच्या हक्कांचे आणि आर्थिक सुरक्षिततेचे खऱ्या अर्थाने मजबूत संरक्षण करतो.

### अलीकडील काही महत्त्वाची प्रकरणे व कायदेशीर घडामोडी

डिजिटल बँकिंगच्या वाढत्या वापरासोबतच सायबर फसवणुकीच्या घटनांमध्येही प्रचंड वाढ झाली आहे. अशा प्रकरणांमध्ये ग्राहकांची फसवणूक झाल्यानंतर "व्यवहार ग्राहकाच्या संमतीने किंवा ओटीपीद्वारे झाला आहे" असे कारण पुढे करून बहुतांश बँका आपली जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करतात. मात्र, नुकत्याच आलेल्या काही महत्त्वपूर्ण न्यायालयीन निकालांनी बँकांच्या या भूमिकेला मोठा आळा घातला आहे.

### या संदर्भातील काही प्रमुख अलीकडील प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत:

#### १. सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय

**प्रकरण:** एका ग्राहकाच्या खात्यातून मोबाईल ॲप डाऊनलोड करायला लावून फ्रॉडस्टर्सनी ९४,२ रुपयांची फसवणूक केली. एसबीआय ने ही फसवणूक ग्राहकाने स्वतः ओटीपी किंवा एम-पिन शेअर केल्यामुळे झाली असे म्हणत नुकसान भरपाई देण्यास साफ नकार दिला.

**न्यायालयाचा निकाल:** सर्वोच्च न्यायालयाने बँकेचा युक्तिवाद फेटाळून लावत स्पष्ट केले की, ग्राहकांना फसवणुकीपासून सुरक्षित ठेवण्याची मुख्य जबाबदारी बँकांचीच आहे. बँकांनी फसवणूक रोखण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. जर ग्राहकाने २४ तासांच्या आत बँकेला माहिती दिली असेल, तर आरबीआयच्या 'झिरो लायबिलिटी' नियमानुसार बँक संपूर्ण रक्कम परत करण्यास बांधील आहे.

#### २. बँक ऑफ बडोदा प्रकरण (मुंबई उच्च न्यायालय – मे २०२६)

प्रकरण: 'सिम स्वॅप' द्वारे सायबर गुन्हेगारांनी एका ग्राहकाच्या खात्यातून १.२४ कोटी रुपयांची फसवणूक केली. बँकेने या व्यवहारांची जबाबदारी घेण्यास नकार दिला होता.

**न्यायालयाचा निकाल:** मुंबई उच्च न्यायालयाने बँक ऑफ बडोदाला मोठा दणका देत ग्राहकाला आरबीआयच्या 'झिरो लायबिलिटी' संरक्षणांतर्गत संपूर्ण पैसे परत करण्याचे निर्देश दिले. कोर्टाने स्पष्ट केले की, जर यंत्रणेतील तांत्रिक त्रुटीमुळे (उदा. सिम स्वॅप) फसवणूक झाली असेल आणि ग्राहकाचा थेट निष्काळजीपणा सिद्ध होत नसेल, तर बँकांना पळवाट शोधता येणार नाही.

#### ३. नागपूर ग्राहक मंचाचा निकाल (जुलै २०२६ – 'डिजिटल अरेस्ट' घोटाळा)

प्रकरण: नागपूरमधील एका सायबर फसवणुकीच्या ('डिजिटल अरेस्ट') प्रकरणात, फसवणूक झालेली रक्कम एका संशयित 'मनी म्युल' बँक खात्यात जमा झाली होती. ग्राहकाने तात्काळ तक्रार करूनही आयसीआयसीआय बँकेने ते खाते गोठवण्यास टाळाटाळ केली आणि आपली कोणतीही चूक नाही असे घोषित केले.

**आयोग निर्णय:** जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने बँकेला सेवेतील हलगर्जीपणाबद्दल दोषी धरले आणि मूळ रकमेसह भरपाई देण्याचे आदेश दिले. ग्राहकाने तातडीने माहिती दिल्यानंतरही संशयित खात्यामधील व्यवहार रोखण्यात अपयशी ठरलेल्या बँकांना आता ग्राहक मंचातही मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

स्वातंत्र्य दिन विशेष

# GEN -Z वकिलांना न्याय व्यवस्थेतही हवेत बदल ?





### तरुण वकिलांचे प्रश्न आणि न्यायव्यवस्थेचे भवितव्य

ली कुआन यू यांच्या मते, न्यायव्यवस्थेची खरी कसोटी ती सुव्यवस्था आणि न्याय प्रस्थापित करू शकते का, यामध्ये असते. सध्या आर्थिक असुरक्षिततेमुळे तरुण वकील वकिलीपासून दूर जात असून, हा लोकशाहीचा मोठा प्रश्न बनला आहे. यावर मात करण्यासाठी 'यंग लॉयर्स फंड'द्वारे पहिल्या तीन वर्षांसाठी १५,००० ते २५,००० रुपये मासिक विद्यावेतन आणि सवलतीच्या दरात चेंबर्सची सोय करून आर्थिक सुरक्षा देणे आवश्यक आहे. तसेच मोबाईल-फ्रेंडली ई-कोर्ट सेवा, मोफत एआय कायदेशीर संशोधन, संकरित सुनावण्या आणि १२,००० ते १८,००० रुपयांचे किमान विद्यावेतन निश्चित करून वकिलांचे शोषण थांबवले पाहिजे. खटल्यांचा ताण कमी करण्यासाठी मध्यस्थी (ADR) केंद्रांचा विस्तार आणि आधुनिक अभ्यासक्रमांसह राष्ट्रीय कायदेशीर अकादमीची स्थापना करावी. सरकारची भूमिका अडथळे दूर करण्याची असून, न्याय हा प्रेक्षकांचा खेळ नसून सहभागी लोकशाही आहे.

**-ॲड. मिलिंद बाबासाहेब ठोकळ,** उच्च न्यायालय, मुंबई



### न्यायव्यवस्था सुधारणांची अपेक्षा

आजचा कायदेशीर व्यवसाय एका परिवर्तनाच्या टप्प्यावर उभा आहे. सरकारकडून माझी हीच अपेक्षा आहे की, तरुण वकिलांना आदराने, समान संधीने आणि व्यावसायिक सक्षमतेने पुढे जाण्यासाठी एक पोषक इकोसिस्टम निर्माण केली जावी. सुरुवातीच्या वर्षांत संरचित मार्गदर्शन, व्यावहारिक प्रशिक्षण आणि आर्थिक आधार मिळण्यावर भर असला पाहिजे. न्यायव्यवस्थेच्या सर्व स्तरांवर ई-फायलिंग, संकरित सुनावणी, AI-आधारित कायदेशीर संशोधन आणि डिजिटल रेकॉर्डचा विस्तार करून पायाभूत सुविधांचे आधुनिकरण करणे गरजेचे आहे. न्यायाधीशांची रिक्त पदे भरून, केस मॅनेजमेंट सुधारून आणि मध्यस्थी-लवादाला (MEDIATION & ARBITRATION) प्रोत्साहन देऊन खटल्यांचा प्रलंबित वेग कमी करणे तितकेच महत्त्वाचे आहे. तसेच, आरोग्य विमा, मानसिक आरोग्य आधार आणि आर्थिक सुरक्षेसारख्या कल्याणकारी उपायांची पूर्तता करत सरकारने उदयोगाभिमुख व उदयोन्मुख क्षेत्रांतील सततच्या कायदेशीर शिक्षणात गुंतवणूक करावी. मी अशा न्यायव्यवस्थेची कल्पना करते जी जलद, पारदर्शक, तंत्रज्ञान-आधारित आणि सर्वसमावेशक असेल, जिथे प्रत्येक होतकरू तरुण वकिलाला भारताच्या संवैधानिक लोकशाहीत अर्थपूर्ण योगदान देण्याची संधी मिळेल.

**-ॲड. रुपाली मिश्रा**



### न्यायव्यवस्थेतील प्रलंबित खटले आणि तरुण वकिलांचे प्रश्न

जेन झी वकील म्हणून, मी मानतो की आज आपल्या न्यायव्यवस्थेसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे खटल्यांच्या निकालाला होणारा उशीर. जलद आणि अधिक प्रभावी न्याय सुनिश्चित करण्यासाठी न्यायमूर्तींची रिक्त पदे प्राधान्यक्रमाने भरली गेली पाहिजेत, न्यायालयाच्या पायाभूत सुविधा मजबूत केल्या पाहिजेत आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला गेला पाहिजे. वकिलांना त्यांच्या व्यावसायिक कर्तव्याच्या निर्वाह दरम्यान धमक्या, दमदाटी आणि हिंसेपासून संरक्षण देण्यासाठी सरकारने 'ॲडव्होकेट्स प्रोटेक्शन ॲक्ट' (ADVOCATES PROTECTION ACT) चे ENACTMENT आणि प्रभावी अंमलबजावणी यांना देखील प्राधान्य दिले पाहिजे. तसेच, सरावच्या सुरुवातीच्या वर्षांत तरुण वकिलांसाठी किमान निश्चित विद्यावेतन (STIPEND), संरचित मार्गदर्शन आणि कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करणे तितकेच महत्त्वाचे आहे. तरुण वकिलांमध्ये गुंतवणूक करणे म्हणजे भारताच्या न्याय वितरण प्रणालीच्या भविष्यात गुंतवणूक करणे होय.

**-ॲड. आकाश कामठे**



### तरुण वकिलांची आर्थिक सुरक्षा आणि न्यायव्यवस्थेचे बळकटीकरण

एक तरुण वकील म्हणून, मी मानतो की कायदेशीर क्षेत्र मजबूत करण्यात आणि न्याय वितरण प्रणाली अधिक कार्यक्षम व सुलभ करण्यात सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

सरावच्या सुरुवातीच्या वर्षांत आर्थिक असुरक्षितता ही तरुण वकिलांसमोरील सर्वात मोठी चिंतेची बाब आहे. स्थिर उत्पन्नाच्या अभावामुळे अनेक प्रतिभावान वकील वकिली सोडण्यास प्रवृत्त होतात. म्हणूनच, माझा ठाम विश्वास आहे की, तीन वर्षांपर्यंतचा सराव असलेल्या वकिलांना शासनाच्या एका पारदर्शक योजनेतून दरमहा विद्यावेतन किंवा आर्थिक सहाय्य मिळायला हवे. या उपक्रमामुळे आर्थिक पार्श्वभूमीचा विचार न करता होतकरू तरुण वकिलांना या क्षेत्रात टिकून राहण्यास प्रोत्साहन मिळेल.

तसेच, कायदेशीर मदत (LEGAL AID) कार्यक्रमांचा विस्तार करताना त्यात सहभागी होणाऱ्या तरुण वकिलांना योग्य संधी आणि मानधन उपलब्ध करून दिले पाहिजे. कायदेशीर शिक्षण आणि प्रत्यक्षातील सराव यांच्यातील दरी कमी करण्यासाठी परवडणाऱ्या सततच्या कायदेशीर शिक्षणाला (CLE), इंटर्नशिप, मेंटॉरशिप प्रोग्राम्स आणि व्यावसायिक विकास उपक्रमांना चालना देणे गरजेचे आहे.

**-ॲड. सुशांत जावीर**



### न्यायिक प्रक्रियेतील विलंब आणि वकिलांचे संरक्षण

एक तरुण वकील म्हणून, मी मानते की आज आपल्यासमोरील सर्वात मोठी चिंतेची बाब म्हणजे न्याय प्रक्रियेतील विलंब. खटले चालण्यासाठी अनेक वर्षे लागतात आणि जेव्हा जेव्हा न्यायालयात न्यायाधीशांची बदल होतो, तेव्हा नवीन न्यायाधीशाला नव्याने प्रकरण समजून घ्यावे लागल्यामुळे कामाला मागे गेल्यासारखे वाटते. आधी झालेली प्रगती नष्ट होऊ नये, यासाठी प्रक्रियेत सुसंगतता आणि कार्यक्षमता आणण्याची खरी गरज आहे. मला असेही प्रकर्षाने वाटते की 'ॲडव्होकेट्स प्रोटेक्शन ॲक्ट' ची ठोस अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. तरुण वकील, विशेषतः महिला वकील, व्यावसायिक कर्तव्ये पार पाडत असताना कठीण आणि असुरक्षित परिस्थितीचा सामना करू शकतात. वकिलांना गरज भासल्यास मदत आणि संरक्षण मागता येईल, अशी योग्य यंत्रणा उभी राहायला हवी. बारच्या पुढील पिढीसाठी, सरकारचे लक्ष जलद न्याय, चांगल्या न्यायालयीन पायाभूत सुविधा, वकिलांसाठी मजबूत संरक्षण आणि तरुण वकिलांना व्यावहारिक सहाय्य देण्यावर असावे, अशी माझी अपेक्षा आहे. एक सुरक्षित आणि अधिक कार्यक्षम व्यवसाय शेवटी उत्तम न्याय वितरणात हातभार लावेल.

**ॲड. ऋतुजा शेळके**



### न्यायव्यवस्था आणि कायदेशीर क्षेत्रात काळाची गरज असणाऱ्या सुधारणा

प्रत्येक क्षेत्रात GEN Z ने आपल्या कौशल्याने व तंत्रज्ञानाच्या आधारे स्वतंत्र स्थान निर्माण केले असून, वकिली व्यवसायही याला अपवाद नाही. मूलभूत हक्कांपासून पर्यावरण आणि उद्योगांपर्यंत प्रत्येक क्षेत्रात वकीलाची भूमिका महत्त्वाची असते. कठोर परिश्रम, सातत्य आणि कायद्याच्या अभ्यासासोबतच शासनाची धोरणात्मक मदत, सक्षम न्यायव्यवस्था आणि आधुनिक सुविधा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. कायदेशीर क्षेत्रातील सुधारणांचा विचार करताना सर्वात आधी शिक्षणाचा पाया मजबूत करणे गरजेचे आहे. AI, सायबर लॉ, डेटा प्रायव्हसी, कमर्शियल लॉ आणि IPR यांसारख्या आधुनिक विषयांचा अभ्यासक्रमात समावेश व्हावा. विद्यार्थ्यांना न्यायालयाच्या प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव आणि अनिवार्य कोर्ट इंटर्नशिप मिळणे आवश्यक असून, IIT व IIM च्या धर्तीवर सरकारी विधी विद्यापीठांची निर्मिती करावी.

आजची डिजिटल पिढी मोबाईलवर माहिती शोधत असल्याने, शासनाने AI आधारित अधिकृत लिगल रिसर्च टूल अद्ययावत केसु लॉ आणि सर्व न्यायालयांमध्ये डिजिटल सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच देशभरात युनिफॉर्म ई-फायलिंग प्रक्रिया, ऑनलाइन केस ट्रॅकिंग आणि शासकीय विभागांचे डिजिटल इंटग्रेशन काळाची गरज आहे. शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचवण्यासाठी मोफत लीगल एड कॅम्प्स्मध्ये तरुणांना सामावून घ्यावे.

आर्थिक व व्यावसायिक अडचणींचा सामना करणाऱ्या तरुण वकिलांसाठी शासनाने स्टायपेंड प्रोग्राम, संशोधन फेलोशिप, कमी व्याजात व्यावसायिक कर्जे, शासकीय विभागात लीगल ऑफिसर पदे आणि परवडणारी लीगल रिसर्च टूल्स उपलब्ध करून द्यावीत. या उपाययोजना केवळ जेन-झी ला सक्षम करण्यासाठी नसून, उद्याची एक मजबूत आणि प्रभावी न्यायव्यवस्था घडवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत.

**-ॲड.रुपेश राऊत**

# एबीसी ऑफ जजमेंट रायटिंग: न्यायव्यवस्था परीक्षांसाठी उपयुक्त सर्वसमावेशक मार्गदर्शक

न्यायव्यवस्था परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी "एबीसी ऑफ जजमेंट रायटिंग" हे न्यायमूर्ती एल. के. भार्गव (निवृत्त) आणि डॉ. मनमोहन जोशी (एम. जे. सर) यांचे पुस्तक अत्यंत महत्त्वपूर्ण ठरत आहे.

**पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये:** न्यायव्यवस्था परीक्षांमध्ये कायदेशीर ज्ञान, सामान्य ज्ञान, संगणक ज्ञान, इंग्रजी भाषा आणि मुख्यत्वे जजमेंट रायटिंग (निर्णय लेखन) यांसारख्या अनेक पैलूंचा समावेश असतो. या पुस्तकात न्यायनिवाडा लेखनाच्या सर्व तांत्रिक बाबींचा सखोल समावेश करण्यात आला आहे:




**मजकुराची व्याप्ती:** जजमेंट रायटिंगची मूलभूत तत्त्वे आणि अचूक स्वरूप

**कायदेशीर प्रक्रिया:** मुद्द्यांची निश्चिती आणि आरोप निश्चित करणे

**कायदेशीर ज्ञान:** संबंधित कायद्यांचे सखोल ज्ञान आणि विशेषतः पुराव्यांचे मूल्यमापन व विश्लेषण करण्याचे तंत्र.

**विविध राज्यांचे फॉरमॅट्स:** देशातील विविध राज्यांमधील जजमेंट रायटिंगचे फॉरमॅट्स आणि मार्गदर्शक उदाहरणांचा समावेश.

**कायदेशीर कौशल्य आणि परीक्षाभिमुख तयारी :** न्यायव्यवस्था परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी केवळ कायदेशीर कलमांचे पाठांतर करून चालत नाही, तर प्रत्यक्ष कोर्टरूममध्ये न्यायाधीश झाल्यानंतर निकाल कसा तयार करावा लागतो, याची व्यावहारिक जाण असणे अत्यंत आवश्यक असते. या पुस्तकाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान देत नाही, तर प्रत्यक्ष निकालपत्राचा मसुदा तयार करण्यासाठी लागणारे तांत्रिक कौशल्य विकसित करते.

फौजदारी आणि दिवाणी दोन्ही प्रकरणांमध्ये साक्षीपुराव्यांचे योग्य मूल्यमापन कसे करावे, वादाचे मुद्दे कसे ठरवावेत आणि युक्तिवादाच्या आधारे निष्कर्षापर्यंत कसे पोहचावे, याचे सविस्तर मार्गदर्शन यात मिळते. विविध राज्यांच्या न्यायव्यवस्था परीक्षांच्या बदलत्या पॅटर्ननुसार विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी हे पुस्तक एक अचूक आणि खात्रीशीर साधन ठरत आहे.

न्यायव्यवस्था परीक्षांची तयारी करणाऱ्या आणि जजमेंट रायटिंगच्या कौशल्यात प्राविण्य मिळवू इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी हे पुस्तक एक उत्तम आणि मार्गदर्शक संदर्भग्रंथ आहे.

# पेटंट ड्राफ्टिंग अँड स्पेसिफिकेशन रायटिंग: कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी एक मार्गदर्शक पुस्तक

कायद्याच्या अभ्यासात आणि बौद्धिक संपदा अधिकारांच्या (IPR) क्षेत्रात आपले ज्ञान अधिक समृद्ध करण्यासाठी डॉ. एस. आर. मायनेनी यांचे "पेटंट ड्राफ्टिंग अँड स्पेसिफिकेशन रायटिंग" हे नवीन २०२६ ची आवृत्ती असलेले पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे. अलाहाबाद लॉ एजन्सी, फरिदाबाद यांच्या द्वारे प्रकाशित हे पुस्तक एलएलबी (LLB), एलएलएम (LLM) आणि विविध विद्यापीठांमधील कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

**पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये आणि अंतर्भूत विषय:** पारंपरिक कायदेशीर शिक्षणात पेटंट ड्राफ्टिंग हा एक अत्यंत तांत्रिक आणि महत्त्वाचा विषय मानला जातो. या पुस्तकात विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विविध विषयांची सखोल मांडणी करण्यात आली आहे:




**सखोल अभ्यास :** पेटंट ड्राफ्टिंग आणि स्पेसिफिकेशन रायटिंगचे सविस्तर विश्लेषण.

**कायदेशीर तरतुदी आणि निवाडे:** कायदेशीर तरतुदींसोबतच महत्त्वाचे खटले (CASE LAWS) आणि व्यावहारिक उदाहरणांचा (PRACTICAL ILLUSTRATIONS) समावेश.

**प्रमुख विषय:** पेटंट एक बौद्धिक संपदा अधिकार, बौद्धिक संपदा हक्क (IPR), अधिकारांचे प्रकार आणि मालमत्ता हक्क यांसारख्या मूलभूत संकल्पनांवर विशेष भर.

**अध्यायनिहाय रचना:** परीक्षेच्या प्रभावी तयारीसाठी आणि संकल्पना स्पष्ट होण्यासाठी पुस्तकाची रचना अत्यंत सुटसुटीत अध्यायनिहाय करण्यात आली आहे.

**परीक्षा आणि व्यावसायिक भविष्यासाठी उपयुक्त:** कायद्याच्या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या आणि पेटंट एजंट किंवा आयपीआर वकील बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरणार आहे. पुस्तकाची २०२६ ची नवी आवृत्ती बाजारात उपलब्ध असून, ती कायदेशीर अभ्यासकांसाठी संग्रही ठेवण्यासारखी आहे.

# लॉ रिलेटिंग टू स्पेसिफिक परफॉर्मन्स: दिवाणी वकील आणि कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त मार्गदर्शक




दिवाणी न्यायालयातील प्रॅक्टिस करणाऱ्या वकिलांसाठी आणि कायद्याच्या अभ्यासमग्न विद्यार्थ्यांसाठी "लॉ रिलेटिंग टू स्पेसिफिक परफॉर्मन्स" हे अत्यंत महत्त्वपूर्ण पुस्तक मार्गदर्शक ठरणार आहे. विशिष्ट कार्यपालन अधिनियम अंतर्गत 'स्पेसिफिक परफॉर्मन्स' हा दिवाणी कायद्याचा अत्यंत कळीचा आणि महत्त्वाचा भाग मानला जातो.

**पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये आणि महत्त्व:** करारांचे अचूक विश्लेषण: हे पुस्तक कायदेशीर तरतुदी आणि महत्त्वाच्या न्यायालयीन निवाड्यांच्या आधारे करारांच्या विशिष्ट पालनाचे सखोल स्पष्टीकरण देते.

**वाचकांसाठी उपयुक्तता:** दिवाणी बाजूचे (CIVIL SIDE) प्रॅक्टिस करणारे वकील, न्यायाधीश आणि कायद्याचे शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्यासाठी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त आहे.

**प्रकाशन आणि गुणवत्ता:** कायदेशीर पुस्तकांच्या क्षेत्रात ३०० हून अधिक पुस्तके प्रकाशित करणाऱ्या नामांकित प्रकाशक संस्थेने हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. अचूकता, विश्वसनीयता आणि कायदेशीर ज्ञानाची स्वाक्षरी हे या प्रकाशनाचे वैशिष्ट्य आहे.

दिवाणी कायद्याच्या अभ्यासात आणि न्यायालयीन कामकाजात कायदेशीर तरतुदींची अचूक माहिती मिळवण्यासाठी हे पुस्तक प्रत्येक कायदेशीर अभ्यासकाच्या पुस्तकात संग्रही असणे गरजेचे आहे.




# द लॉ ऑफ एव्हिडन्स, १२ वी आवृत्ती: एम. मोनीर यांचे कायदेशीर जगातील सर्वोत्कृष्ट पुस्तक

कायदेशीर अभ्यासक, न्यायाधीश आणि कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी पुरावा कायद्याच्या (LAW OF EVIDENCE) क्षेत्रात अत्यंत आदरणीय आणि प्रमाण मानले जाणारे "द लॉ ऑफ एव्हिडन्स" (THE LAW OF EVIDENCE) हे एम. मोनीर यांचे प्रसिद्ध पुस्तक १२ व्या आवृत्तीत उपलब्ध झाले आहे.

**पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये आणि महत्त्व:** सखोल आणि सर्वसमावेशक विश्लेषण: भारतीय पुरावा कायद्याच्या प्रत्येक कलमाचे सविस्तर स्पष्टीकरण, त्यामागचा कायदेशीर हेतू आणि कायदेशीर बारकावे या पुस्तकात अत्यंत सुलभ भाषेत मांडण्यात आले आहेत.

**न्यायालयीन निवाडे :** सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांचे ऐतिहासिक तसेच ताज्या निकालांचे संदर्भ यात समाविष्ट आहेत, ज्यामुळे वकिली करताना किंवा अभ्यास करताना अचूक दाखले मिळण्यास मदत होते.

**वाचकांसाठी उपयुक्तता:** फौजदारी आणि दिवाणी बाजूचे प्रॅक्टिस करणारे वकील, न्यायव्यवस्था परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी, एलएलबी आणि एलएलएम चे विद्यार्थी यांच्यासाठी हे पुस्तक एक अनिवार्य संदर्भग्रंथ मानले जाते. पुष्कल कायदेशीर ज्ञानाचा साठा असलेला हा ग्रंथ कायदेशीर ग्रंथालयात आणि प्रत्येक वकिलाच्या टेबलवर संग्रही असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

# कॉकरोच जनता पार्टी अन् बोगस वकिलांची चौकशी?

## न्यायालयाच्या तोंडी निरीक्षणांच्या व्यावसायिक गैरवापराबाबत केंद्र सरकार, बार कौन्सिल आणि सीबीआयकडे सर्वोच्च न्यायालयाने मागितले स्पष्टीकरण; याचिका दाखल

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

बनावट वकील, बोगस कायद्याच्या पदव्या आणि 'कॉकरोच जनता पार्टी' (सीजेपी)शी संबंधित व्यक्तींच्या हालचालींची चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी केंद्र सरकार, बार कौन्सिल ऑफ इंडिया (बीसीआय) आणि केंद्रीय अन्वेषण विभागाला (सीबीआय) नोटीस जारी केली आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने वकील राजा चौधरी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सरकार, सीबीआय आणि बीसीआयचे उत्तर मागितले आहे. याचिकेत सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजादरम्यान करण्यात आलेल्या तोंडी निरीक्षणांच्या व्यावसायिक शोषणाविरुद्ध आणि कमाईसाठी केल्या जाणाऱ्या प्रसाराविरुद्ध कारवाईची मागणीही करण्यात आली आहे.




१५ मे रोजी झालेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाच्या प्रक्रियेचा गैरवापर, वरिष्ठ वकील पदाची मानद उपाधी आणि वकिली क्षेत्रातील खालावत चाललेल्या व्यावसायिक मानकांवर चिंता व्यक्त करण्यात आली होती. याचिकेत नमूद केल्यानुसार, सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी सुनावणीदरम्यान केलेल्या काही रुपकात्मक "कॉकरोच" संदर्भातील टिप्पण्या नंतर निवडकपणे क्लिप करून, मीम्सच्या स्वरूपात, विडंबन करून आणि संविधानात्मक व प्रक्रियात्मक संदर्भापासून वेगळे करून डिजिटल माध्यमातून व्यावसायिकरीत्या प्रसारित केल्या गेल्या.

ही याचिका न्यायव्यवस्था, लोकशाही असंतोष, उपहास किंवा संविधानाच्या कलम १९(१)(अ) अंतर्गत संरक्षित असलेल्या स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या विरोधात नसून, न्यायालयाच्या तोंडी कामकाजाच्या व्यावसायिक गैरवापराच्या विरोधात असल्याचे याचिकेत स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच "कॉकरोच जनता पार्टी" सोबत जोडलेल्या उपक्रमांसह तोंडी निरीक्षणांच्या अनधिकृत व्यावसायिक वापराशी संबंधित व्यक्ती किंवा संस्थांवर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

**'कॉकरोच जनता पार्टी' आणि ऑनलाइन चळवळ**

यावर्षी मे महिन्यात सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर, विशेषतः तरुण वापरकर्त्यांमध्ये 'कॉकरोच जनता पार्टी' हे उपरोधिक ऑनलाइन आंदोलन सुरू झाले होते. या ऑनलाइन चळवळीला X (ट्विटर) वर शेकडो हजारो आणि इंस्टाग्रामवर २२ दशलक्षांहून अधिक फॉलोअर्स मिळाले.

१५ मे रोजी सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने, रोजगारापासून दूर जात सोशल मीडिया आणि आरटीआय सक्रियतेकडे वळणाऱ्या बेरोजगार तरुण वकिलांवर चिंता व्यक्त केली होती. त्यावेळी सरन्यायादिशांनी "काही तरुण कॉकरोचसारखे आहेत..." अशी टिप्पणी केली होती. मात्र, सरन्यायाधीशांनी नंतर स्पष्ट केले होते की, त्यांची निरीक्षणे ही सामान्य बेरोजगार तरुणांवर नसून, बनावट पात्रतेच्या आधारे व्यवसायात प्रवेश करणाऱ्या व्यक्तींवर होती.

दरम्यान, हा गट अमेरिकेच्या बॉस्टन येथील रहिवासी असलेल्या अभिजीत दीपकेद्वारे सुरू करण्यात आला होता. या गटाने बेरोजगारी, संस्थात्मक उत्तरदायित्व आणि मीडिया स्वातंत्र्य यांसारख्या मुद्द्यांचा राजकीय उपहासाचा वापर केला. याशिवाय, नीट आणि इतर प्रश्नपत्रिका फुटीच्या मुद्द्यावर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत या सामूहिक संघटनेने जंतरमंतरवर एक मोठे आंदोलनही आयोजित केले होते, त्यानंतर मंत्र्यांना पद सोडावे लागले होते.

# पोक्सो गुन्ह्यांमध्ये आईची तडजोड बेकायदा

## केरळ उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय, अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात याचिका फेटाळली

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी दाखल करण्यात आलेले गंभीर गुन्हे कौटुंबिक पातळीवर किंवा पालकांमध्ये झालेल्या तडजोडीच्या आधारावर रद्द केले जाऊ शकत नाहीत, असा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि स्पष्ट निर्णय केरळ उच्च न्यायालयाने दिला आहे. पोक्सो कायद्यांतर्गत नोंदवलेले गुन्हे हे समाजहिताशी आणि बालकांच्या संरक्षणाशी जोडलेले असल्याने त्यात तडजोड करण्यास कायद्यानुसार मज्जाव असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

कुटुंबातील एका अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात वडिलांविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान, पीडित मुलीच्या आईने आणि कुटुंबातील इतर सदस्यांनी आपसात समझोता झाल्याचे सांगत हा खटला किंवा एफआयआर रद्द करण्याची विनंती न्यायालयाला केली होती. कुटुंबांतर्गत वाद मिटल्यामुळे आणि मुलीच्या भवितव्याचा विचार करून हा खटला पुढे चालवू नये, असा युक्तिवाद करण्यात आला होता. केरळ उच्च न्यायालयाने हा युक्तिवाद अत्यंत कठोर शब्दांत फेटाळून लावला. न्यायालयाने स्पष्ट केले की, लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण करणारा पोक्सो कायदा हा अत्यंत संवेदनशील आणि कठोर उद्देशासाठी बनवण्यात आला आहे.



अशा गुन्ह्यांचे स्वरूप केवळ कौटुंबिक किंवा वैयक्तिक स्वरूपाचे नसते, तर ते थेट समाजाच्या सुरक्षिततेशी संबंधित असते. त्यामुळे, कितीही कौटुंबिक समझोता किंवा तडजोड झाली तरी गंभीर गुन्ह्यांच्या बाबतीत फौजदारी कारवाई अशा प्रकारे संपुष्टात आणता येत नाही.

न्यायालयाने नमूद केले की, कायद्याच्या दृष्टीने अशा गुन्ह्यांमध्ये तडजोड करण्याची कोणतीही तरतूद किंवा मुभा दिली जाऊ शकत नाही. जर अशा प्रकरणांमध्ये तडजोडला मान्यता दिली, तर कायद्याचा मूळ उद्देश आणि कडक अंमलबजावणी धोक्यात येईल. बालकांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या निकालातून देण्यात आला आहे. या निकालान्वये न्यायालयाने संबंधित प्रकरणातील कायदेशीर कारवाई सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# निवडणुका लढण्यासाठी दोनच अपत्ये नियमाचा फेरविचार?

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

ग्रामपंचायत किंवा इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यासाठी दोनपेक्षा अधिक अपत्ये असलेल्या व्यक्तींना अपात्र ठरवण्याच्या नियमावर फेरविचार करण्याची गरज आहे का, या अत्यंत महत्त्वपूर्ण मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने आपला निकाल राखून ठेवला आहे. न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठाने या प्रकरणावरील सविस्तर सुनावणी पूर्ण केल्यानंतर हा निर्णय सुरक्षित ठेवला आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मधील कलम १४(१)(ज-१) नुसार, १३ सप्टेंबर २००० नंतर ज्या व्यक्तीला तिसरे अपत्य जन्माला आले आहे, ती व्यक्ती ग्रामपंचायतीची निवडणूक लढवण्यास किंवा सदस्य पद भूषवण्यास अपात्र ठरते. सुनावणीदरम्यान देशात कोणतीही एकसमान भूमिका पाहायला मिळत नाही. देशातील तब्बल ७ राज्यांनी 'दोन अपत्यांचे धोरण' आता रद्द केले आहे. १५ राज्यांमध्ये असे कोणतेही निर्बंध किंवा धोरण अस्तित्वात नाही. ही बाब याचिकाकर्त्यांनी न्यायालयासमोर नमूद केली.

NATARAJ REALTY
Nataraj Realty
CIVIL ENGG. & CONTRACTORS
PROMOTERS & BUILDERS
Vikram Agarwal B.E. Civil
+91 9766532648
1041, Nataraj Court, Shukrawar Peth, Pune - 411 002
vikrammittal5006@gmail.com www.natarajrealty.com

Registration for Periodicals Title "Developed Nations Law News" vide PRGI Registration No. MHMUL/25/A0594. Printed by Shree Samarth Printers, Published by Sanjay Raghunath Sapkale on behalf of Sanjay Raghunath Sapkale, printed at Pune and published at C - 205, Fortune Empress Society, Haandewadi Road, Autade Haandewadi, Haveli, Hadapsar. Managing Editor: M J Srikant.